महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: २६, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार २४ सप्टेंबर २०२४ ते सोमवार ३० सप्टेंबर २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## ‘उद्धव ठाकरेंना महाविकास आघाडीतून बाहेर काढण्याचा काँग्रेसचा प्रयत्न’, भाजपा नेत्याचा मोठा दावा

■ मुंबई : विशाल कारंडे

**महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. राजकीय पक्षांनी विधानसभेच्या अनुषंगाने मोर्चेबांधणीला सुरुवात करत अनेक नेत्यांच्या बैठकांचा धडाका सुरु आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील पक्षांमध्ये जागावाटपासंदर्भात चर्चा देखील सुरु आहेत. विधानसभेला महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा प्रमुख सामना रंगण्याची चिन्ह आहेत.**

मात्र, असे असतानाच भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठा दावा केला आहे. ‘उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीमधून बाहेर काढण्याचा काँग्रेसचा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा प्रयत्न सुरु आहे’, असा मोठा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे. त्यांच्या या दाव्यामुळे चर्चांना उधाण आलं आहे. महायुतीमधून अजित पवार यांना बाहेर काढण्यात येणार असल्याच्या चर्चांवर बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ‘उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे पे वर्कर यासाठी खोटा नरेटिव्ह तयार करत आहेत त्यामधून अशा प्रकारच्या बातम्या येतात. मात्र, मी तर असं म्हणतो की, उद्धव ठाकरे यांना महाविकास आघाडीमधून बाहेर काढायचा प्रयत्न काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट करत आहेत. उद्धव ठाकरेंना कबूल केलं की मुख्यमंत्री करू. पण ते उद्धव ठाकरे यांना साथ देत नाहीत. त्यांना दिल्लीत दोन दिवस बसून ठेवलं होतं. उद्धव ठाकरे देखील मुख्यमंत्री पद द्या, म्हणून दिल्लीत कटोरा घेऊन फिरत होते. मात्र, दोन दिवस राहून देखील ते तेथून मोकळा कटोरा घेऊन आले’, अशी टीका चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.






(शेष पृष्ठ २ वर)

## संक्षिप्त

### ‘रामदास आठवले राजकारणातले हवामान तज्ज्ञ, सरकार कुणाचंही येऊ द्या..’, नितीन गडकरींचं वक्तव्य

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

नितीन गडकरी हे गेल्या काही दिवसांपासून खूप चर्चेत आहेत. शनिवारीच त्यांनी पुण्यातल्या कार्यक्रमात एक विधान केलं होतं ज्याची चांगलीच चर्चा झाली. राजाने टीका सहन केली पाहिजे



आणि त्यावर विचार केला पाहिजे असं मत त्यांनी मांडलं होतं. नितीन गडकरी हे त्यांच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखले जातात. आता नितीन गडकरींनी केंद्रीय मंत्री रामदास आठवलेंबाबतही एक महत्त्वाचं विधान केलं आहे. नागपुरातल्या एका पुरस्कार वितरण सोहळयात त्यांनी रामदास आठवलेंबाबत भाष्य केलं. मारवाडी फाऊंडेशनर्फे देण्यात येणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार रविवारी नागपुरात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते देण्यात आला. त्यावेळी बोलताना रामदास आठवले यांनी त्यांच्या भाषणात आतापर्यंत तीनवेळा केंद्रात मंत्रीपद मिळालं आणि चौथ्यांदा सरकार आल्यावर मंत्री होणारच असे मत व्यक्त केलं.

### तिरुपती मंदिरातील लाडू घोटाळा SIT च्या कोर्टात, CM नायडूंनी घेतला मोठा निर्णय

■ आंध्र प्रदेश : वृत्तसंस्था

मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी तिरुपती बालाजी मंदिरात प्रसाद म्हणून वाटल्या जाणाऱ्या लाडूंमध्ये कथित अनियमितता आणि प्राण्यांची चरबी आढळल्याच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. पत्रकार परिषदेद्वारे नायडू यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, आम्ही विशेष तपास पथक तयार करत आहोत. SIT या प्रकरणाची



सखोल चौकशी करेल आणि त्याचा रिपोर्ट आम्हाला सादर करेल, जेणेकरून दोषींना शिक्षा होईल आणि भविष्यात अशी कोणतीही घटना टाळता येईल. याशिवाय राज्यातील सर्व मंदिरांची स्वच्छता मोहीम लवकरच सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी मागील सरकारवर आरोप करत त्यांच्या राजवटीत अनेक गैरप्रकार झाल्याचे सांगितले. आमचे सरकार ती व्यवस्था साफ करेल. ते म्हणाले की, तिरुमलामध्ये गेल्या पाच वर्षांत अनेक अपवित्र गोष्टी झाल्या आहेत, आम्ही त्यांची चौकशी करून साफ करू. आपल्या पक्षाच्या कार्यालयात माध्यमांना संबोधित करताना नायडू म्हणाले की, मंदिरांमध्ये जे काही घडले आहे, त्यानंतर स्वच्छता आवश्यक आहे.

## पाकिस्तानी चित्रपट भारतात प्रदर्शित होण्यापूर्वीच वादाच्या भोवऱ्यात; मनसेने दिला गंभीर इशारा

■ मुंबई : नितीन देवळेकर

मुंबईला चित्रपटसृष्टीची जननी म्हटलं जातं. भारतामध्ये अनेक भाषांच्या विविध चित्रपटसृष्टी आहे. बॉलीवुडची चर्चा तर जगभरात होत असते. मात्र आता भारतामध्ये पाकिस्तानी चित्रपट प्रदर्शित होत असल्यामुळे रोष व्यक्त केला जात आहे. पाकिस्तानी ‘द लेजंड ऑफ मौला जट्ट’ हा चित्रपट प्रदर्शनाच्या पूर्वीच वादाच्या भोवऱ्यामध्ये अडकला आहे. यामध्ये पाकिस्तानी अभिनेता फवाद खान आणि माहिरा खान या कलाकारांनी काम केलं आहे. यामुळे आता नवीन वाद उफाळला असून




मनसेने मात्र याला तीव्र विरोध केला आहे. राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत पाकिस्तानी चित्रपट भारतात प्रदर्शित केल्यास महागात पडेल असा थेट इशारा दिला आहे. ‘लिजेंड ऑफ मौला जट’ हा सिनेमा चर्चेच्या वर्तुळामध्ये राहिलेला आहे. हा सिनेमा भारतामध्ये प्रदर्शित केला जाणार असल्यामुळे रोष व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रामध्ये हा ‘लिजेंड ऑफ मौला जट’ सिनेमा प्रदर्शित करण्यास मनसेचा नकार आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कडक शब्दांत इशारा दिला आहे. राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, (शेष पृष्ठ २ वर)

## धार्मिक स्थळाचा अनधिकृत भाग तोडण्यावरून धारावीत तणावपूर्ण स्थिती

■ मुंबई : गणेश बागडे

धारावीत सध्या तणावपूर्ण स्थिती निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. धारावीत असणाऱ्या मशिदीचा अवैध्य भाग तोडण्यासाठी बीएमसीचे एक पथक धारावीत गेलं होते. मात्र यामुळे तेथे वाद सुरु झाल्याचं पाहायला मिळत आहे. बीएमसीचं पथक धारावीत गेलं असतं तेथील नागरिकांनी या पथकाला कारवाई करण्यापासून अडवलं. तसेच बीएमसी अधिकाऱ्याच्या वाहनांवर देखील दगडफेक केली. या घटनेत वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. शिवाय मशिदीवरील कारवाई रोखण्यासाठी धारावीत शेकडोंच्या संख्येने जमाव रस्त्यावर उतरला असल्याचं पाहायला मिळत आहे. धारावील



वाढता तणाव पाहता पोलिसांचा मोठा फौजफाटा घटनास्थळी रवाना झाला आहे. तसेच तेथे उपस्थित असणाऱ्या पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील प्रसिध्द ठिकाण असलेल्या धारावीत एक मशिद आहे. मात्र या मशिदीचा काही भाग अवैध असल्याचं सांगितलं जात आहे. धारावी शहरातील ९० फूट रोडवरील २५ वर्ष जुनी अशी ही सुभानिया मशीद आहे. ह्या मशिदीचा अवैध भाग तोडण्यासाठी आज बीएमसीचं पथक धारावीच्या दिशेने रवाना झालं होतं. मशिदीचा अवैध्य भाग तोडला जाणार आहे, ह्याची माहिती धारावीतीली नागरिकांना होती. त्यामुळे ही कारवाई रोखण्यासाठी नागरिकांनी रात्री पासूनचं आंदोलन सुरु केलं होते. धारावीत लोकांचं म्हणणं आहे की, ही मशिद २५ वर्षे जुनी आहे. मशिदीसोबत लोकांच्या भावना जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे ही मशिद पाडू नये. (शेष पृष्ठ २ वर)

## केंद्र सरकारच्या ‘या ’ निर्णयामुळे कर्मचाऱ्यांना निवृत्तीवर मिळणार एक कोटी रुपये

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी यूनिफाईड पेन्शन स्कीम (यूपीएस) लागू केल्यानंतर आता केंद्र सरकार खाजगी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना आणि कर्मचारी पेन्शन योजना सदस्यांनी केलेल्या योगदानावरील मर्यादा वाढविण्याचा सरकार विचार करत आहे. केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडविया यांनी याबाबतचे संकेत दिले असून असे झाल्यास कर्मचाऱ्यांना निवृत्तीवर एक कोटी रुपये मिळू शकतील. सध्या नोकरदारांच्या पगार दरमहा १५ हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी असल्यास कर्मचारी आणि नियोक्ता दोघेही पगाराच्या १२ऱ्ह योगदान देतात. नियोत्त्याचे योगदान दोन भागांमध्ये विभागले जातात त्यापैकी ८.३३% EPS तर उर्वरित ३.६७ऱ्ह भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा केले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या कर्मचाऱ्याचा पगार दरमहा १५,००० रुपये असेल तर भविष्य निर्वाह निधीमध्ये कर्मचाऱ्याचे योगदान १,८०० रुपये तसेच नियोत्त्याचे भविष्य निर्वाह निधीमध्ये योगदान ५५०.५० रुपये आणि पेन्शन योजनेमध्ये १,२४९.५० रुपये असेल. अशा स्थितीत आता हीच वेतन मर्यादा वाढवण्याचा सरकार विचार करत आहे. वेतन मर्यादा २१,००० रुपये करण्याचा सरकार विचार करत असून हा प्रस्ताव मंजूर झाल्यास २१ हजार रुपये कमाई करणारा कर्मचारी २,५२० रुपये तर नियोत्त्याचे योगदान EPF मध्ये ७७०.७० रुपये आणि EPS मध्ये १,७४९.३० रुपये असेल. त्यामुळे आता सरकारने




पेन्शन खात्यातील वेतन मर्यादा २१ हजार रुपयांपर्यंत वाढवली तर ३५ वर्षे योगदान देणारा २३ वर्षीय कर्मचाऱ्याचा एकूण निधी एक कोटींवर पोहोचू शकतो. १५,००० रुपयांच्या सध्याच्या मर्यादेवर ही रक्कम ७१.५५ लाख इतकी होते ज्यामध्ये एकूण योगदान १०.७१ लाख रुपये आणि व्याज ६०.८४ लाख रुपये होते. तसेच २१ हजार हजारांच्या मर्यादेत एकूण योगदान १५ लाख आणि व्याज ८५ लाख रुपये होईल ज्यामुळे कर्मचाऱ्यांना अतिरिक्त २८.४५ लाख रुपये मिळू शकतात.

## ‘नियतीने मला राजकारणात आणलं’, अमेरिकेतील भारतीयांशी संवाद साधताना मोदींचं विधान

■ नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात ते अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करणार आहेत. तसेच ते ‘क्वाड’ राष्ट्रांच्या वार्षिक शिखर परिषदेतही सहभागी झाले आहेत. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज अमेरिकेतील भारतीयांशी संवाद साधला आहे. यावेळी पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांचं कौतुक केलं. तसेच ‘मी स्वत:साठी दुसरा मार्ग निवडला होता, दुसरं काहीतरी वेगळं करायचं ठरवलं होतं. मात्र, नियतीने मला राजकारणात आणलं’, असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

‘आपण गुजरातचे मुख्यमंत्री होऊ, असं मला कधीच वाटलं नव्हतं. त्यानंतर



गुजरातचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपद भूषविण्याचा मान मिळेल याचाही अंदाज नव्हता. एक काळ असा होता की, मी स्वत:साठी दुसरा मार्ग निवडला होता. मी कधीच मुख्यमंत्री होईल असं वाटलं नव्हतं. पण मी गुजरातचा सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलो. त्यानंतर लोकांनी मला पदोन्नती दिली आणि पंतप्रधान केलं’, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

‘कोट्यवधी भारतीयांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी आपलं जीवन समर्पित केलं. पहिल्या दिवसांपासून माझं मन आणि ध्येय स्पष्ट होतं की, मी स्वराज्यासाठी माझं जीवन देऊ शकलो नाही. मात्र, मी समृद्ध भारतासाठी माझं जीवन समर्पित करीन असे ठरवले आहे’, असंही पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. (शेष पृष्ठ २ वर)

## चाईल्ड पॉर्नोग्राफी पाहणं आणि डाऊनलोड करणं पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा- सुप्रीम कोर्ट

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

सुप्रीम कोर्टाने लहान मुलांशी संबंधित पॉर्नोग्राफी सामग्रीवर एक मोठा निर्णय सुनावला आहे. अशा प्रकारचा कंटेंट पाहणं, डाऊनलोड करणं पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा आहे असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे. हा निर्णय सुनावताना सुप्रीम कोर्टाने मद्रास हायकोर्टाचा निर्णय रद्द केला आहे. हायकोर्टाने चाईल पॉर्नोग्राफी पाहणं आणि कंटेंट डाऊनलोड करणं पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्ह्याच्या कक्षेत येत नाही असा निर्णय दिला होता. सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारदीवाला आणि मनोज मिश्र यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी त्यांना हायकोर्टाने निर्णय सुनावताना मोठी चूक केल्याचं




सांगितलं. तसंच यावेळी त्यांनी केंद्राला चाईल्ड पॉर्नोग्राफी ऐवजी ’बाल लैंगिक शोषण आणि गैरवर्तन सामग्री’ अशा शब्द वापरण्यास सांगितलं. मद्रास उच्च न्यायालयात एक प्रकरण आलं होतं, (शेष पृष्ठ २ वर)

## तर पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, पडळकर आणि भुजबळांनाही इंगा दाखवू; ओबीसी आंदोलकांचा नेत्यांनाच इशारा

■ मुंबई : सम्यक कासारे

एकीकडे मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरू केलेलं असतानाच ओबीसी समाजही आंदोलन करत आहे. ओबीसी समाजातील काही कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. जालन्यातील वडीगोद्रीत हे उपोषण सुरू आहे. उपोषणाचा पाचवा दिवस असूनही प्रशासनाने हालचाली सुरू केलेल्या नाहीत. त्यामुळे ओबीसी बांधव आक्रमक झाले आहेत. विशेष म्हणजे ओबीसी नेत्यांनीही या आंदोलनाकडे पाठ फिरवली आहे. पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकर आणि छगन भुजबळ या ओबीसी नेत्यांनी आंदोलनाकडे पाठ फिरवल्याने समाज आक्रमक झाला आहे. दोन दिवसात हे ओबीसी नेते आंदोलनाच्या ठिकाणी



आले नाही तर त्यांना निवडणुकीत इंगा दाखवू, असा इशाराच या समाज बांधवांनी दिला आहे. लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांना समर्थन म्हणून गेवराई येथून ओबीसी समाज बांधवांनी मोटरसायकल रॅली काढली होती. सुरुवातीला सोलापूर- धुळे या राष्ट्रीय महामार्गावर (शेष पृष्ठ २ वर)

## मनसेची बैठक सोडून राज ठाकरेंनी अचानक मुख्यमंत्री शिंदेंची भेट का घेतली? नेमकी काय चर्चा झाली?

■ मुंबई : यश सावंत


विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय नेत्यांच्या बैठकांचा धडाका सुरु आहे. यातच अनेक नेते राज्यातील विविध मतदारसंघाच्या दौऱ्यावर जाऊन पक्षाच्या कामाचा आढावा आणि आगामी विधानसभेची रणनीती आखत आहेत. या दौऱ्याच्या माध्यमातून पक्षाच्या कामाचा आढावा आणि उमेदवारांची चाचपणी करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही पक्ष संघटनेच्या मोर्चेबांधणीला सुरुवात करत राज्यभरात दौरा केला आहे. या दौऱ्यावेळी राज ठाकरे यांनी विधानसभेसाठी



काही उमेदवारांची देखील घोषणा केली आहे. यानंतर आता मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज (२३ सप्टेंबर) मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. मात्र, मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक सोडून राज ठाकरे यांनी आज अचानक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन भेट घेतली. राज ठाकरे यांनी घेतलेल्या या अचानक भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या भेटीदरम्यान राज ठाकरे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीत जवळपास आर्धा तास चर्चा झाली आहे. मात्र, या भेटीत काही राजकीय चर्चा झाली का? कोणती राजकीय चर्चा झाली? आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने काही चर्चा झाली आहे का? असे अनेक सवाल आता राजकीय वर्तुळातून उपस्थित करण्यात येत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने राज ठाकरे यांनी मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत राज ठाकरे मनसेच्या पदाधिकाऱ्यांना काही महत्वाच्या सूचना देणार असल्याची माहिती सांगितली जात आहे.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स






## एकदाच काय ते...

'एक सूर, एक ताल' या संकल्पनेवर विश्वास असलेल्या विचारमुशीतून बाहेर पडलेल्या नरेंद्र मोदींनी २००९ च्या सुमारास मांडलेला एक महत्त्वाचा प्रस्ताव आता अगदी ऐरणीवर आला आहे. 'एक देश एक निवडणूक' ही कल्पना ते सातत्याने मांडत आले आहेत. त्यासंबंधीचा ठराव पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या कार्यकाळातले १०० दिवस पूर्ण करताना मोदींनी मंत्रिमंडळात संमत करुन घेतला. एकनाथ शिंदे, चंद्राबाबू नायडू, नितीशबाबूंनीही 'मम' म्हटले आहे, हे विशेष. देशात या ना त्या राज्यात सतत निवडणुका सुरु असतात. त्यामुळे संपूर्ण देश सतत राजकारणातच रमून जातो. चर्चांचे विषयही निवडणुकीच्या राजकारणात रुतून बसतात. ते प्रगतीच्या नवकल्पनांचा थांडोळा घेण्याकडे वळतच नाहीत. वारंवार होणाऱ्या निवडणुकांवरील करावा लागणारा खर्च हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. लोकसभेच्या निवडणुकीवर करदात्यांचे ६० ते ७० हजार कोटी खर्च होतात, असा एक अंदाज आहे. शिवाय असाच खर्च राज्यातल्या निवडणुकांवर होतो. प्रत्येक राज्याचे वेगवेगळे वेळापत्रक व त्यानिमित्त मोठमोठी आश्वासने देत रेवड्या वाटण्याची सुरु होणारी चढाओढ यामुळे देशातले वातावरण सतत मतदारांच्या अनुनयाचे आणि विसंवादी राहते.

प्रत्येक राजकीय पक्षाची धाव या निवडणुकीपासून त्या निवडणुकीपर्यंत सुरु राहाते अन् परस्परांवर कुरघोडी करण्याच्या राजकीय अभिनिवेशात मूळ प्रश्नांकडे, उत्पादकतावाढीकडे, दारिद्र्यनिर्मूलनाकडे दुर्लक्ष होते हा या संकल्पनेमागचा गाभ्याचा मुद्दा. पैसाच नव्हे तर मनुष्यबळही त्यात गुंतून पडते.



सहासहा महिने विकासप्रक्रिया खंडित राहाते. हे सगळे पटण्यासारखे आहे. कायदा आयोगाने एक निवडणूक संकल्पना उचलून धरली. मोदी सरकारने नेमलेल्या माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील आयोगानेही ती मान्य करणारा अहवाल विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला.भारतासारख्या खंडप्राय देशात एकाचवेळी लोकसभा व विधानसभा निवडणुका घेतल्या तर मतयंत्रांची तजवीज करणे शक्य असल्याची विधाने निवडणूक आयोगाशी संबंधित उच्चपदस्थ मंडळी करत आहेत. जर्मनी, फ्रान्स आदी प्रगत देशांत सर्व निवडणुका एकत्रच होतात. अमेरिकेतही दर चार वर्षांनी सर्व राज्ये ,परगण्यांच्या निवडणुका एकत्रच होतात. हे सगळे मान्य केले तरी प्रश्न उरतो तो भारतासारख्या विविधरंगी, बहुपक्षीय प्रणालीत हे मतदानातले एकजिनसीपण प्रत्यक्षात आणणे शक्य आहे काय हाच. या लाखमोलाच्या प्रश्नाचे उत्तर नाही असे आहे. एक देश -एक निवडणूक ही क्रांतिकारी सुधारणा आहे. भारतातील १९५१ची पहिली सार्वत्रिक निवडणूक आणि पुढची १९५७ ची निवडणूक लोकसभा आणि विधानसभेचे एकत्र मतदान करणारी होती. नंतर काँग्रेसची राष्ट्रीय राजकारणावरची पकड ढिली झाल्यामुळे राज्य सरकारे पडू लागली अन् केंद्र व राज्यांच्या निवडणुका वेगवेगळ्या होऊ लागल्या. 'विधानसभेची मुदत संपलेल्या चार राज्यांच्या निवडणुका एकत्र घेऊ न शकणारे देशभरातल्या निवडणुका एकत्र कशा घेणार', यापासून 'हा निर्णय अध्यक्षीय प्रणालीकडे सुरु असलेली वाटचाल आहे'', इथपर्यंतची टीका विरोधकांनी सुरु केली आहे. ती बव्हंशी राजकीय आहे. मात्र टीकेच्या स्वरांची तीव्रता लक्षात घेता ही सुधारणा प्रत्यक्षात येणे कठीण. ही सुधारणा देशाचे राजकीय चित्र आमूलाग्र बदलून टाकणारी आहे. मात्र ती प्रत्यक्षात येण्यासाठी लोकसभा, राज्यसभेत दोनतृतीयांश बहुमताची, शिवाय अर्ध्याहून जास्त राज्यांच्या विधिमंडळांत तसा ठराव करायची गरज असेल. लोकसभेत दोनतृतीयांश बहुमतासाठी ६९ मतांची तर राज्यसभेत ३० मतांची सत्ताधारी आघाडीला गरज आहे. निवडणूक प्रचंड प्रमाणात काळ्या पैशाचे अभिसरण करते. त्याचे लाभार्थी नानाविध छोटेमोठे लोक असतात. त्यामुळे कलम ३७० रद्द करताना बहुमत नसतानाही जी जादुई आकडेवारी भाजपने जमा केली ते संख्याबळ यावेळी जमा करणे कठीणच नव्हे, तर सध्या अशक्यच. लोकसभेत निर्णायक बहुमत मिळाले नाही किंवा असलेले बहुमत गेले तर पुन्हा निवडणुकीला सामोरे जायचे की पाच वर्षे ती व्यवस्था रेटायची? राज्यांबाबत हा प्रश्न अधिकच भीषण. जेथे राज्य सरकारे कोसळतात तेथे नव्याने निवडणुका घेतलीच तर लोकांनी निवडून दिलेल्या सरकारला पाच वर्षांचा कालावधी पूर्ण न करता लोकसभेबरोबर विसर्जित व्हावे लागेल. विशाल भूभाग असलेल्या देशात अशा राष्ट्रव्यापी निवडणूक कार्यक्रमाचा लाभ भाजप, काँग्रेससारख्या बड्या पक्षांना मिळू शकतो.अन्य पक्षांना बड्यांच्या वळचणीला जाऊन बसावे लागते. हे मान्य होणे शक्य आहे काय? देशभरात निवडणुका घ्यायला आवश्यक असलेला फौजफाटा सुरक्षायंत्रणा पुरवू शकतात काय, याचाही विचार करावा लागेल. विधानसभेपाठोपाठ १०० दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान व्हावे, असेही कोविंद यांची समिती म्हणते.अडीच वर्षे प्रशासकयुग भोगणाऱ्या महाराष्ट्राला हे शब्द खराखुरा दिलासा देऊ शकतील, असे वाटत नाही. प्रचलित राजकारणाच्या स्तराला अनेकजण कंटाळले आहेत. निवडणुका हा लोकशाहीचा उत्सव खरा; पण तो कंटाळी होऊ लागल्याने नकोसाही वाटू लागला आहे. सतत परस्परांना बोल लावणारी राजकीय धुळवड हेच सध्याचे राजकारण झाले आहे. 'एक देश- एक निवडणूक' प्रस्ताव प्रत्यक्षात आल्यास काळापैसावाले, संधीसाधू लाभार्थी नाराज होतील. त्यांची काळजी करण्याचे कारणच नाही. परंतु भारताला या बाबतीत विकसित देशांच्या पंक्तीत बसवणारा हा निर्णय प्रत्यक्षात येण्याची वाट कमालीची खडतर आहे. सर्व पक्षांचे सहकार्य मिळविण्यात सरकारची कसोटी लागेल. सहमतीचे राजकारण त्यासाठी आवश्यक आहे.

# प्रतिमानिर्मितीचे प्रयोग

गमावलेली पत कशी मिळवायची याचा गृहपाठ करुनच अरविंद केजरीवाल राजकारणात आले असावेत. आम आदमीच्या चेहऱ्यामागे दडलेली अतिमहत्त्वाकांक्षा आणि आक्रमक मानसिकतेतून अराजकतेची सीमारेषा ओलांडल्याने केजरीवाल वारंवार अडचणीत आले आहेत. पण त्याचबरोबर अनपेक्षित राजकीय चालींद्वारे संकटातून सहीसलामत बाहेर पडण्याचे कसबही त्यांनी दाखवले आहे.

जामिनावर सुटताच राजीनाम्याची घोषणा करून आणि अतीशी या महिला सहकाऱ्याला मुख्यमंत्री करून त्यांनी धूर्तपणाचे दर्शन घडवले आहे. एक तर अतीशी या विश्वासातील आहेत. केजरीवाल यांच्या शब्दाबाहेर जाणार नाहीत. दुसरे म्हणजे पत्नीला हे पद दिले असते तर घराणेशाहीचा आरोप झाला असता. ती संधीही केजरीवाल यांनी विरोधकांना दिली नाही. दिल्लीचे तीनवेळा मुख्यमंत्रीपद भूषविताना आम आदमी पार्टी सरकारविषयी जनतेची धारणा सकारात्मक राहील, याचे भान केजरीवाल यांनी बाळगले, हे मान्य करावे लागेल. पण कथित मद्य धोरण गैरव्यवहारात केजरीवाल यांना सूत्रधार ठरवून त्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना ईडीने अटक केल्यामुळे 'आप'विषयीची प्रतिमा डागाळली गेली. त्यात भर पडली ती मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न देता सुमारे सहा महिने तुरुंगातून दिल्लीचा कारभार चालविण्याच्या त्यांच्या हेकेखोरपणाची. मुख्यमंत्री असताना तुरुंगात जाण्याची वेळ आली असताना हेमत सोरेन यांनीच नव्हे तर अगदी जे. जयललिता आणि लालूप्रसाद यादव यांच्यासारख्या दिग्गजांनीही राज्यघटना शिरोधार्य मानून मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला होता. पण केजरीवाल यांनी ते केले नाही.

आजवर अनेकदा नाट्यमय चाली खेळून त्यांनी लक्ष वेधून घेतले आहे. संसद भवना'बाहेर पदपथावर झोपून केंद्र सरकारच्या विरोधात आंदोलन करणे, उपराज्यपालांच्या निवासस्थानात सलग नऊ दिवस धरणे देणे, ईडीच्या नोटिसा अवैध आणि बेकायदा ठरवून धुडकावून लावताना केजरीवाल यांनी राज्यघटनेला छेद देणारे वर्तन केले. '' केजरीवाल अराजकतेचे मूर्तिमंत प्रतीक असून घटनेविषयीची त्यांची आत्मीयता बेगडी आहे,'' अशी टीका करण्याची संधी त्यामुळे राजकीय विरोधकांना मिळाली.

मद्यधोरण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने काही शर्तीवर जामीन मंजूर करताना केजरीवाल यांना मुख्यमंत्री म्हणून काम करण्यासाठी फारसा वाव ठेवला नव्हता. त्यामुळे उर्वरित कारकीर्द निष्प्रभ ठरणार हे उघडच होते. न्यायालयाने बंधने घालण्यापूर्वीच उपराज्यपाल विनयकुमार सक्सेना यांनी केंद्राच्या इशाऱ्यावर केजरीवाल यांचे मुख्यमंत्री म्हणून काम करणे दुरापास्त करुन ठेवले होतेच.




दिल्लीतील सत्ता ही केजरीवाल यांच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे. दिल्लीतील सत्तेच्या जोरावरच केजरीवाल यांनी देशभर आपला ब्रँड प्रस्थापित केला. कथित मद्य धोरण गैरव्यवहार,राज्यघटनेचा अनादर आणि ५० कोटी रुपये खर्चून बांधलेले मुख्यमंत्र्यांच्या आलिशान 'शीशमहल' निवासस्थानामुळे मलिन झालेली प्रतिमा स्वच्छ करण्यासाठी जनतेच्या दरबारात जाऊन 'मिच्छामी दुक्कडम'शिवाय केजरीवाल यांच्याकडे पर्याय नव्हता.

पाच महिन्यांनंतर दिल्लीत होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी स्वतःच निर्माण केलेल्या राजकीय चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी 'त्यागा'ची खेळी केली आहे. आपल्या उत्तराधिकारी म्हणून त्यांनी आतिशी यांची निवड केली. अतिमहत्त्वाच्या पदांवर महिलांची नियुक्ती केल्याने जनतेचा रोष मावळतो, हे केजरीवाल पंतप्रधान मोदींच्या कार्यशैलीतून शिकले असावेत.

आतिशी यांचा चेहरा दिल्लीच्या कॉस्मोपॉलिटन प्रकृतीला मानवणारा आहे. केजरीवाल यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीत सलग तीन लोकसभा निवडणुकांमध्ये 'आप'ला खाते उघडता आलेले नसले तरी दिल्लीतील सर्वसामान्य जनता केजरीवाल यांच्या विरोधात नाही, तर त्यांच्या धोरणांमुळे समाधानी असल्याचाच निष्कर्ष दिल्ली विधानसभेच्या गेल्या दोन निवडणुकांमधून निघू शकतो.

वीज आणि पाण्याच्या बिलांमध्ये मिळणारी पन्नास टक्के सवलत, सरकारी शाळा, सरकारी इस्पितळे व मोहल्ला क्लिनिक तसेच महिलांसाठी दिल्लीची मोफत बससेवा या सुविधांनी दिल्लीकरांचे जीवन सुसह्य केले आहे. आम आदमी पार्टीच्या या जमेच्या बाजू ठरल्या आहेत. दिल्लीत 'आप'ला सत्तेबाहेर करण्यासाठी लागणारा चेहरा आणि रणनीती भाजप किंवा काँग्रेसपाशी नाही. त्यामुळे केजरीवाल आणि त्यांच्या 'आप'च्या भविष्याच्या दृष्टीने दिल्ली सुरक्षित आहे. केजरीवाल यांच्यापाशी कल्पकता आहे. दोन राज्यांतील सत्तेमुळे अवघ्या अकरा वर्षांत मिळालेला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा, कुठल्याही आमीषाला बळी न पडणारे, पाटी कोरी असलेले व मध्यमवर्गावर प्रभाव टाकू शकणारे तरुण नेते या वैशिष्ट्यांमुळे केजरीवाल यांचा पक्ष बाल्यावस्थेत असूनही भाजप आणि काँग्रेसशी झुंजत राष्ट्रीय राजकारणात टिकून राहिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा पर्याय म्हणून देशाच्या राजकारणात प्रस्थापित करण्यासाठी दिल्लीचे मुख्यमंत्रीपद फारसे उपयुक्त नसल्याची जाणीव केजरीवाल यांना झाली आहे. त्यामुळेच मुख्यमंत्रीपदासाठी आतिशी यांचा चेहरा पुढे करुन स्वतःच्या राजकीय भवितव्याचा नव्याने शोध घेताना केजरीवाल यांना त्यांचा 'त्याग' सार्थकी लावावा लागणार आहे.

# पशुपालक समाज आणि लोकवाणी

ग्रामविश्वाच्या विशाल क्षेत्रात श्रम आणि जीवन या दोन्ही बाबी महत्त्वाच्या राहिल्या आहेत. चारापाणी, घरदार, शेती यांच्याशी जोडून असणारे एक अथांग प्राणिविश्व आपल्याभोवती वेढूनच असते. महत्त्वाचे म्हणजे, प्राणी आणि व्यक्ती यांची एक स्वतंत्र जीवनबोलीच आहे. जी तेथील श्रमपरंपरेचा अपरिहार्य भाग होऊन आकाराला आलेली असते.

जसे की, म्हैसपालन, शेळीपालन, गायीपालन, बैलपालन, कोंबड्यापालन, कुत्रापालन, मांजरपालन. हे पालनरूप सर्वठायी गावखेड्यांत निकटतम आणि माणूस व व्यक्ती यांच्यातील स्नेहभाव म्हणून महत्त्वाचा असा पहायला मिळतो. तसा या पालनसंस्कृतीवर आज काहीसा बदलत्या जगरहाटीचा दूरगामी परिणाम दिसत असला, तरी प्राणी आणि माणूस यांचा आंतरिक सहसंबंध कायमचा तुटलेला नाही. श्रम, अन्न, दूध, सेंद्रिय खत, खिल्लार, रीतभात, बाजारहाट आणि पुंजीचा एक भाग म्हणून डोमॅस्टिक प्राणिविश्व आणि माणूस यांचा अनुबंध कधी कायम तुटला असं घडत नाही. 'आरं, थीर, थीर, थीर, थीर...' असं म्हणून शेळीपालन करताना गावाच्या श्रमशील जगाने शेळ्यांना घातलेली हाक किंवा चराईत राखलेल्या शेळ्या भाषेलाही काही ऐवज पुरवतात. थीरथीरची ही एका लयीतली भाषा भाषासौंदर्य आणि सुलभीकरणाचा भाग म्हणून जशी काव्यगत आहे, तशीच लययुक्त आणि प्रवाहीदेखील आहे. यातील महत्त्वाचे तत्त्व असे की, मुक्या प्राण्यांना बोलक्या माणसाची ही भाषा चटकन कळते. सराव किंवा सवय ही यातील गोष्ट अधिक महत्त्वाची ठरते, हा पण प्राणिभाषेतला एक प्राण आहे.



कठीण वर्ण किंवा कठीण घटक या भाषेत मुळीच नसतो. हेही प्राण्यांसाठी योजलेल्या या भाषेचे एक लक्षणीय विशेष आहे. एखादा स्वर, वर्ण पुन्हा पुन्हा उच्चारून पशुपालन समाज हा त्या प्राण्यांना योग्य ती सूचना करतो. या सूचना चालत राहा, चारा खा, पाणी पी, बैस, नीघ, धाव, जा, जाऊ नको... या प्रकारचे संदेश पोहोचवतात. न-भाषा असलेल्या प्राण्यांना होय-भाषेचा मिळणारा हा मौलिक संदेश आहे. दि, दी, दी, दी म्हणून बैलांना हाकले जाते. बैलांच्या पायांत एखादवेळी काही अडथळा आला तर उच, उच, उच.... असा ध्वनी काढून योग्य तो इशारा बैलास केला जातो आणि योग्य ती कृती बैल पार पाडतात. या प्रमाणेच, कोंबडीपालन या प्रकारचा नगदी व्यवसाय करणारा पशुपालक गावसमाज पाहायला मिळतो. 'आ, आ, आ, ती, ती, ती,आ...' ही कोंबड्यांना मारलेली हाक लगोलग कळते आणि कोंबड्या अन्नाच्या गरजेतून किंवा सुरक्षेच्या गरजेतून माणसाजवळ येतात. या प्रमाणेच, दै हो, दै हो, दै हो किंवा गावडीहो, गावडीहो अशी जोरदार हाक घालून बैलांना, गायींना पशुपालक समाज हाकताना दिसतो. प्रदेश बदलला की, पुन्हा हे हाकण्याचे ध्वनी भिन्न भिन्न असलेले ऐकायला मिळतात. हादेखील प्रादेशिक विशेष. महत्त्वाची बाब अशी की, स्वर, ताल, संगीत, गेयता यांच्या आत्मसातीकरणाच्या पुष्कळ निकट असते हे प्राणिविश्व ! ओठांचा चंबू करून माणसाने घातलेली गोड अशी शीळ बैलांना चटकन कळते आणि पाण्याजवळ आणलेले बैल मग या शीळेच्या मधूर नादाने घटाघटा पाणी पितात. महत्त्वाचे म्हणजे, इथे सूरांची भाषा आहे.

पान १ वरुन...

## 'उद्धव ठाकरेंना महाविकास...

'शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते म्हणत आहेत की, महाराष्ट्राला उद्धव ठाकरेंची गरज आहे. मात्र, दुसरं कोणीही त्यांच्याकडे पाहायला तयार नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना आघाडीमधून बाहेर काढण्याची चर्चा विदर्भात आहे. नागपूरमध्ये ठाकरे गटाला एकही जागा कोणी द्यायला तयार नाही. काँग्रेसने जाहीर केलं की नागपूरमधील सर्व जागा आम्ही लढणार, त्यामुळे उद्धव ठाकरे यांना बाहेर काढण्याचं काम महाविकास आघाडीतील दुसरे पक्ष करत असल्याचं दिसत आहे', असा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

## पाकिस्तानी चित्रपट भारतात...

फवाद खान नावाच्या पाकिस्तानी अभिनेत्याचा, 'लिजेंड ऑफ मौला जट' नावाचा सिनेमा लवकरच भारतात प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा सिनेमा कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ देणार नाही. पाकिस्तानी कलाकारांचे सिनेमे मुळात भारतात प्रदर्शित का होऊ दिले जातात? आणि कलेला देशांच्या सीमा नसतात, हे सगळं इतर बाबतीत ठीक आहे, पण पाकिस्तानच्या बाबतीत हे अजिबात चालू देणार नाही. हिंदुस्थानचा द्वेष या एकमेव मुद्द्यावर जो देश तगला आहे, अशा देशातील कलाकारांना इथे आणून नाचवणं, त्यांचे सिनेमे प्रदर्शित करून देणं हा काय प्रकार सुरु आहे? महाराष्ट्र सोडाच पण देशातील कुठल्याच राज्यात हा सिनेमा तिथल्या तिथल्या सरकारांनी प्रदर्शित होऊ नाही दिला पाहिजे' अर्थात बाकीच्या राज्यांनी काय करायचं हा त्यांचा प्रश्न आहे. महाराष्ट्रात हा सिनेमा रिलीज होऊ दिला जाणार नाही, हे नक्की. या आधी असे प्रसंग जेंव्हा आले होते तेंव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने दिलेला दणका सगळ्यांना आठवत असेल. त्यामुळे थिएटर मालकांना सध्या तरी नम्रपणे आवाहन आहे की उगाच सिनेमा प्रदर्शित करण्याच्या भानगडीत पडू नका. हा सिनेमा जेंव्हा प्रदर्शित होणार आहे, त्याच्या आसपास नवरात्रौत्सव सुरु होणार आहे. अशावेळेस कुठलाही संघर्ष महाराष्ट्रात व्हावा अशी माझी इच्छा नाही. आणि तशीच ती इच्छा राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांची पण नसणार. आणि उगाच संघर्ष आम्हाला पण नको आहे' त्यामुळे वेळीच पाऊलं उचलून हा सिनेमा आपल्याकडे प्रदर्शित होणार नाही हे पहावं. मराठी सिनेमांना थिएटर्स उपलब्ध करून देताना मागेपुढे करणाऱ्या थिएटर मालकांनी जर पाकिस्तानी सिनेमाला या भूमीत पायघड्या घातल्या, तर हे औदार्य महागात पडेल हे विसरू नये. कुठल्यातरी पाकिस्तानी सिनेमासाठी राज्यात संघर्ष होऊ नये अशीच माझी इच्छा आहे आणि सरकार त्याकडे योग्य ते लक्ष देईल याची मला खात्री आहे, अशा कडक शब्दांत राज ठाकरे यांनी आपला रोष व्यक्त केला आहे.

## धार्मिक स्थळाचा अनधिकृत..

परंतु बीएमसी अधिकाऱ्यांनी आज ह्या मशिदीचा अवैध भाग पाडण्यासाठी धारावीकडे रवाना झाले. त्यामुळे धारावीत तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. मशिदीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करू देणार नाही, अशी ठाम भुमिका धरावीकरांनी घेतली आहे. यासाठी शेकडोंचा जमाव देखील रस्त्यावर उतरला आहे. धारावीतील नागरिकांनी मशिदीवर कारवाई करण्यासाठी आलेल्या बीएमसी अधिकाऱ्यांना रोखलं. तसेच त्यांच्या गाड्यांची देखील तोडफोड केली. त्यामुळे धारावीतील परिस्थिती गंभीर झाली आहे. या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. दरम्यान, या मशिदीवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जाऊ नये, यासाठी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. याबाबत माहिती देताना काँग्रेस खासदाराने" वर पोस्ट करून लिहिले की, धारावीतील मेहबूब-ए-सुबानिया मशिदीला बीएमसीने पाडण्याच्या नोटीसबाबत मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली आणि लोकांच्या भावना जाणून घेतल्या. मुख्यमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली. संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून कारवाई रोखली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, मुंबई महापालिकेने धारावीतील हिमालय हॉटेलजवळील मेहबूब-ए-सुबानिया मशीद पाडण्याची नोटीस दिल्याचे लिहिले आहे. ही मशीद अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. धारावी पुनर्वसन प्राधिकरणाने (डीआरपी) या मशिदीच्या अतिक्रमणाची चौकशी करावी. मशिदीच्या अतिक्रमणाबाबत डीआरपीचा तपास अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाऊ शकतो. मुंबई महानगरपालिकेने अतिक्रमणाचा मुद्दा उपस्थित करत सुधारात्मक कारवाई करण्याची नोटीस पाठवली आहे. डीआरपीचा तपास अहवाल येईपर्यंत मुंबई महानगरपालिकेची ही कारवाई स्थगित करावी अशी विनंती राज्याचे प्रमुख या नात्याने आम्ही करतो.

## 'नियतीने मला राजकारणात...

'नमस्ते अमेरिका. आता आपला नमस्ते देखील ग्लोबल झाला आहे. प्रत्येक भारतीयांमुळे हे शक्य झालं. खरं तर विदेशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक भारतीयांना मी राष्ट्रदूत मानतो. अमेरिकेतील भारतीयांनी खूप मोठी मजल मारली आहे. भारतीयांमुळे अमेरिकेत आपल्या देशाची प्रतिमा अधिक चांगली बनली आहे. मी प्रत्येकवेळी अमेरिकेत आल्यानंतर तुम्ही सर्वजण पाठिमागचं रेकॉर्ड मोडतात. तुम्ही सर्वजण माझ्यासाठी ब्रँड ॲम्बेसेडर आहात. त्यामुळे मी तुम्हाला सर्वांना राष्ट्रदूत मानतो. तुम्ही सर्वांनी भारत अमेरिकेला आणि अमेरिका भारताला जोडून ठेवण्याचं काम केलं आहे', असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, 'जगाच्या बरोबर जोडण्यासाठी आपली भारतीयता ही सर्वात मोठी ताकद आहे. अमेरिकेत राहणाऱ्या भारतीयांचं योगदान जगाने पाहिलं. जगासाठी 'एआय'चा अर्थ आर्टिफिशियल इंटेलिजन्स आहे. मात्र, मी असं मानतो की, 'एआय' म्हणजे अमेरिका आणि इंडिया. अमेरिका भारत एक आत्मा आहे. हा एआय आत्मा भारत आणि अमेरिका संबंधांना नवीन उंची देत आहे. हेच एआय भारत आणि अमेरिकेला नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी महत्वाचा ठरेल', असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे.

## चाईल्ड पॉर्नोग्राफी पाहणं...

ज्यामध्ये एका २८ वर्षीय व्यक्तीवर त्याच्या फोनवर चाइल्ड पोर्नोग्राफी डाउनलोड केल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. न्यायालयाने या व्यक्तीवरील फौजदारी कारवाई रद्द केली होती आणि म्हटलं होतं की आजकाल मुलं पॉर्नोग्राफी पाहण्याच्या गंभीर समस्येशी झुंजत आहेत आणि त्यांना शिक्षा करण्याऐवजी समाजाने त्यांना शिक्षित करण्यासाठी पुरेसे परिपक्व असलं पाहिजे. सुप्रीम कोर्टाने आज त्या व्यक्तीविरोधातील फौजदारी खटला कायम ठेवला आहे. न्यायमूर्ती जेबी पारदीवाला यांनी मद्रास हायकोर्टाच्या निर्णयावर म्हटलं की, 'तुम्ही (मद्रास हायकोर्ट) निर्णयात चूक केली आहे. यामुळे आम्ही हायकोर्टाचा निर्णय रद्द करत हे प्रकरण पुन्हा सत्र न्यायालयाकडे पाठवत आहोत'. 'कोणतीही व्यक्ती जो लहान मुलांचा समावेश असलेली अश्लील सामग्री फोनमध्ये साठवून ठेवते किंवा ती नष्ट करण्यात अथवा नोंदविण्यास अयशस्वी ठरत असेल तर त्याला कमीत कमी पाच हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा आहे. तसंच गुन्ह्याची पुनरावृत्ती केलेल्या कमीत कमी दहा हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा होईल. जर ही सामग्री पुढे प्रसारित करण्यासाठी संग्रहित केली असेल तर दंडाबरोबरच तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि त्यानंतर दोषी आढळल्यास, सात वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते,' असं कलम सांगतं.

## तर पंकजा मुंडे, धनंजय मुंडे,..

चक्काजाम करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर ओबीसी आंदोलकांनी आंदोलन स्थळापर्यंत रॅली काढली. यावेळी शरद पवार यांच्यासह सत्ताधाऱ्यांविरुद्ध घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी पोलिसांनी चक्काजाम करणाऱ्यांना पांगवले. यावेळी या आंदोलकांनी ओबीसी नेत्यांवरच आपला रोष व्यक्त केला. दोन दिवसात पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, गोपीचंद पडळकर आणि छगन भुजबळ आंदोलनाकडे आले नाही तर त्यांना निवडणुकीत इंगा दाखवू, असा इशाराच या आंदोलकांनी दिला आहे.

दरम्यान, वडीगोद्रीमध्ये ओबीसी आरक्षण बचावासाठी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांचं आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा पाचवा दिवस आहे आणि याच उपोषणाला भेट देण्यासाठी आता दिवसेंदिवस गर्दी वाढताना पाहायला मिळतेय. परिसरातील महिलांनी समर्थन म्हणून आज रॅली काढत उपोषण स्थळी येत पाठिंबा दिलाय. यावेळी महिलांनी जोरदार घोषणाबाजी केली. धनगर समाजाला एसटीतून आरक्षण कोण देईल हे अद्याप माहीत नाही. ही अंधारातली गोष्ट आहे. त्यामुळे धनगर समाज बांधवांनी एसटीची लढाई लढलीच पाहिजे त्याच सोबत ओबीसी आरक्षण देखील वाचवण्यासाठी पुढे आले पाहिजे. मनोज जरांगे हे सलाईन लावून उपोषण करत आहेत. असलं उपोषण मी कधीच पाहिलं नाही. सरकार जरांगेच्या तालावर नाचत आहे. जरांगे तुमच्यासाठी आम्ही हा रस्ता मोकळाच ठेवला होता. तुमचे चेलेचपाटे तुमच्या सांगण्यावरून येथे येऊन शिवीगाळ करतात.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# ‘बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात’ ७५ लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार! आणखी नवीन ३७ दवाखाने सुरू करणार...

■ **मुंबई : राकेश गायकवाड**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा घेणाऱ्या लाभार्थींची संख्या ७५ लाखांहून अधिक झाली आहे. दिवसेंदिवस वैद्यकीय सुविधांमध्ये पडणारी भर पाहता या दवाखान्यांना मिळणारा प्रतिसाद देखील वाढतो आहे. तसेच नागरिकांच्या सोयीच्या वेळेत आणि घराजवळ दवाखाने उपलब्ध असल्याने अधिकाधिक संख्येने मुंबईकर या वैद्यकीय सुविधांचा लाभ घेत आहेत. आतापर्यंत २४३ आपला दवाखाना कार्यान्वित आहेत. तर, नजीकच्या काळात आणखी ३७ दवाखाने सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

बाळासाहेब ठाकरे यांच्या १७ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पुण्यतिथीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजनेचे लोकार्पण करण्यात आले होते. त्यानंतर दिवसागणिक या दवाखान्यांच्या संख्येत भर पडत गेली. एवढेच नव्हे तर या दवाखान्यांमधून लक्षावधी मुंबईकरांना चांगली वैद्यकीय सेवा मिळते आहे. मुंबईकरांना आपल्या परिसरातच, घरानजीकच वैद्यकीय सुविधा मिळण्याच्या उद्दिष्टाने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यांची संख्या अधिकाधिक वाढवून, नियोजित वेळेत करून वैद्यकीय सेवा देण्याच्या सूचना बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. मुंबईकरांना दोन सत्रांमध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देतानाच



गुणवत्तापूर्ण सेवा तसेच पुरेशी औषधी नियमितपणे उपलब्ध करून देण्याच्या सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा यांनी दिल्या आहेत. त्या दृष्टीने देखील नियोजन केले जात आहे.

या संदर्भात माहिती देताना कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शाह यांनी सांगितले की, लोकार्पण दिवसापासून आजपर्यंतचा विचार करता, आपला दवाखान्याच्या माध्यमातून लाभ घेतलेल्या नागरिकांची संख्या आता ७५ लाखांहून अधिक झाली आहे. सद्यस्थितीला आपला दवाखान्यांची एकूण संख्या २४३ इतकी आहे. तर आगामी काळात आणखी ३७ दवाखान्यांची भर पडणार आहे. सध्या कार्यरत असलेल्या आपला दवाखान्यांपैकी, पोर्टाकिबिन्समध्ये ८५, सुसज्ज इमारतीत १७, नियमित दवाखाने १०८ आणि पॉलिक्लिनिक्स ३३ याप्रमाणे दवाखाने कार्यरत आहेत. आरोग्य सुविधांची पुर्तता करण्याच्या अनुषंगाने झोपडीबहुल भागातील प्रत्येक २५ हजार लोकसंख्येसाठी एक दवाखाना तर अडीच लाख लोकसंख्येसाठी एक पॉलिक्लिनिक अशा पद्धतीने सेवा उपलब्ध करून देण्यात येते, असेही डॉ. दक्षा शाह यांनी सांगितले. दोन सत्रांमध्ये दवाखान्याची सेवा रुग्णांसाठी उपलब्ध आहे. मोफत सल्ला, आजाराचे निदान आणि उपचार अशा त्रिसूत्रीवर आधारित या दवाखान्यांमध्ये सुविधा देण्यात येते. या दवाखान्यांच्या ठिकाणी सेवा पुरविण्यासाठी १ हजार १४० कर्मचारी कार्यरत आहेत.

# कामाठीपुराचा पुनर्विकास ‘म्हाडा’कडून काढून घेण्याच्या हालचाली; विशिष्ट विकासकाच्या आग्रहामुळे निर्णय?

■ **मुंबई : विशाल कारंडे**

दक्षिण मुंबईतील कामाठीपुरा या परिसराचा समूह पुनर्विकासाद्वारे कायापालट करण्याची योजना महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून (म्हाडा) गेल्या दोन-तीन वर्षांपासून राबविली जात असून याबाबत शासन निर्णयही जाहीर झाला होता. म्हाडाने सर्व प्रक्रिया पूर्ण करीत निविदा काढण्याचे ठरविल्यानंतर आता हा पुनर्विकास म्हाडाकडून काढून घेण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत. हा पुनर्विकास महापालिकेकडून राबवून तो थेट आपल्याला पदरात पाडून घेण्याच्या एका विशिष्ट विकासकाच्या आग्रहामुळेच हा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. कामाठीपुऱ्यातील इमारतींचे भूखंड छोट्या आकाराचे आणि अरुंद असल्यामुळे या इमारतींचा स्वतंत्र पुनर्विकास शक्य नसल्यानेच समूह पुनर्विकास करण्यात येणार असल्याची घोषणा महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी केली होती. महाविकास आघाडीचे सरकार पडल्यानंतर महायुती सरकारने हा विषय लावून धरला आणि अखेरीस या परिसराच्या पुनर्विकासाबाबत १२ जानेवारी २०२३ रोजी शासन निर्णय जाहीर केला. यानुसार म्हाडाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली. मात्र आता म्हाडाकडून हा पुनर्विकास काढून घेण्याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभागाने मुख्यमंत्र्यांच्या मंजुरीसाठी पाठविल्याचे कळते. हा प्रस्ताव मंजूर झाल्यास महापालिकेकडून कामाठीपुराचा पुनर्विकास केला जाण्याची शक्यता आहे. कामाठीपुरा पुनर्विकासासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती, रहिवाशांची छाननी, प्रस्तावित आराखडा,



वेगवेगळ्या भूखंड मालकांची चर्चा आदी अनेक प्राथमिक बाबी म्हाडाने केल्या आहेत. प्रत्येक रहिवाशाला पाचशे चौरस फुटाचे घर मिळणार असून म्हाडाला हजारहून अधिक घरे विक्रीसाठी मिळणार आहेत. यापेक्षा अधिक घरे देणाऱ्या व सर्व भूखंडमालकांना शीघ्रगणकाच्या २५ टक्के किंवा १५ टक्के इतके बांधीव क्षेत्रफळ देणाऱ्या विकासकाची निविदेद्वारे निवड केली जाणार होती. तसा प्रस्ताव राज्य शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. याबाबत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांना विचारले असता, नियोजन प्राधिकरण कुणीही असले तर काय बिघडले, असा सवाल केला. मात्र याबाबत थेट काहीही सांगण्याचे टाळले. कामाठीपुरा या सुमारे २७ एकरवर पसरलेल्या परिसरात ४७५ उपकरप्राप्त इमारती असून उपकरप्राप्त नसलेल्या १६३ इमारतींसह पुनर्बांधणी करण्यात आलेल्या १५ इमारती तसेच पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या इमारती आहेत. ५२ इमारती कोसळल्या असून १५ धार्मिकस्थळे, दोन शाळा, चार सरकारी कार्यालये आणि आठ इतर बांधकामे आहेत. या सर्व इमारतींची दुरवस्था झाल्याने कामाठीपुऱ्याच्या पुनर्विकासाची जबाबदारी म्हाडाकडे सोपविण्यात आली आहे.

## देशामधील सर्वच मंदिरांतील प्रसादासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करा; ऑल फूड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फेडरेशनची मागणी

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

देशभरातील सर्वच मंदिरामध्ये वितरित करण्यात येणाऱ्या प्रसादाची उच्चस्तरीय तपासणी करावी, तसेच प्रसादाला विशेष दर्जा देऊन तो बनविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करावी, अशी मागणी ऑल फूड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फेडरेशनने भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाला (एफएसएसएआय) पत्र पाठवून केली आहे.

तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यांमध्ये प्राण्याची चरबी आढळल्याचे तिरुमला तिरुपती देवस्थानमने स्पष्ट केले. देवस्थानमने भाविकांच्या भावना व विश्वास याच्याशी खेळ केला आहे. या प्रकरणाने देशभरातील भाविकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. तिरुपतीप्रमाणे देशातील विविध मंदिरांमध्ये प्रशासनाकडून लाडूच्या प्रसादाचे वाटप केले जाते. तिरुपती येथील प्रकरणानंतर या सर्व मंदिरांमधील




प्रसादाची तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यामुळे देशभरातील सर्वच मंदिरांमधील लाडूच्या प्रसादाची उच्चस्तरीय समितीमार्फत तपासणी करावी. तसेच भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण त्यांच्या नियमांमध्ये सुधारणा करून प्रसादाला विशेष दर्जा द्यावा, तसेच प्रसाद बनविण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावी. मुख्यत्वे प्रसादामध्ये कोणत्या घटकांचा वापर करू नये याची यादी जाहीर करावी. ही मार्गदर्शक तत्त्वे सात दिवसांमध्ये जाहीर करावी. या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी ऑल फूड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फेडरेशनने ‘एफएसएसएआय’ला पाठवलेल्या पत्रात केली आहे. तसेच यासंदर्भात तातडीने कार्यवाही न केल्यास या मुद्द्यावर न्यायालयात धाव घेण्यात येईल, असा इशाराही ऑल फूड ॲण्ड ड्रग लायसन्स होल्डर फेडरेशनचे अध्यक्ष अभय पाण्डेय यांनी दिला आहे.

## महापालिकेत आता चेहरा पडताळणीद्वारे हजेरी

■ **मुंबई : गणेश बागडे**

युनिक आयडेंटिफीकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार मुंबई महानगरपालिका प्रशासनाने येत्या १ ऑक्टोबरपासून अधिकारी, कर्मचारी आणि कामगारांची हजेरी चेहरा पडताळणी (फेशिअल बायोमेट्रीक) यंत्राद्वारे करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी आवश्यक यंत्रे उपलब्ध करण्यात येत आहेत. अधिकारी, कर्मचारी व कामगारांना चेहरा पडताळणी उपस्थितीसाठी स्वयंनोंदणी करावी लागेल. शिक्षणाचा अभाव असलेल्या आणि स्वयंनोंदणी करू न शकणाऱ्या कामगार वर्गाकडून त्यास विरोध होऊ लागला आहे. मुंबई महानगरपालिका मुख्यालय आणि २४ विभाग कार्यालयांमध्ये एक लाखाहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. बहुसंख्य मुंबईकर विविध कामांसाठी पालिका मुख्यालय वा विभाग कार्यालयांमध्ये येत असतात. मात्र अनेक वेळा अधिकारी, कर्मचारी जागेवर उपस्थित नसतात. त्यामुळे नागरिकांना वारंवार खेटे घालावे लागत होते. तसेच कर्मचारी हजेरीपटावर स्वाक्षरी केल्यानंतर कार्यालयांतून गायब होत होते. यासाठी प्रशासनाने संगणकीय हजेरीची अंमलबजावणी केली. त्यासाठी महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये बायोमेट्रिक यंत्र बसविण्यात आली.

कार्यालयात आल्यानंतर आणि कार्यालयातून घरी जाण्यापूर्वी बायोमेट्रिक यंत्रावर नोंद करणे प्रत्येक कर्मचाऱ्याला बंधनकारक करण्यात आले. आता ‘युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडिया’च्या निर्देशानुसार सध्या महापालिकेत कार्यरत असलेली यंत्रणा ३० सप्टेंबर २०२४ रोजी कालबाह्य होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने अधिकारी, कर्मचारी, कामगारांना हजेरी नोंदविण्यासाठी फेशिअल बायोमेट्रीक यंत्र उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे.




अधिकारी, कर्मचारी, कामगारांना चेहरा पडताळणी हजेरीसाठी स्वयंनोंदणी करावी लागणार आहे. स्वयंनोंदणी करताना कर्मचाऱ्याला संकेतांक, संपूर्ण नाव, लिंग, मोबाइल क्रमांक, ई-मेल आयडी, आधार क्रमांक, नोंदणीकृत स्थळ, पदनाम, खात्याचे नाव, नियुक्ती दिनांक, सेवानिवृत्ती दिनांक आदीची नोंद करावी लागणार आहे. प्रशासन दरबारी नोंद असलेल्या माहितीत चूक किंवा सुधारणा करावयाची असल्यास कर्मचाऱ्याला संबंधित आस्थापना विभागाशी संपर्क साधून आवश्यक बदल करावे लागणार आहेत. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला पुन्हा स्वयंनोंदणी करावी लागणार आहे. कर्मचाऱ्यांना स्वयंनोंदणी केल्याची पोच संबंधित अधिकाऱ्याला सादर करावी लागणार आहे. उपस्थिती नोंदवताना यंत्रावर कर्मचाऱ्याचा चेहरा दिसणार आहे. त्यामुळे यंत्रावर चेहऱ्याच्या छायाचित्राची नोंद करताना योग्य ती काळजी घ्यावी लागणार आहे. चेहऱ्यावर योग्य प्रकारे प्रकाश पडल्याची खात्री करून नोंदणी करावी लागणार आहे. एकदा नोंदणी झाल्यानंतर सदर छायाचित्र बदलता येणार नाही. महानगरपालिकेच्या सर्व विभागात फेशिअल बायोमेट्रिक यंत्र बसविण्यास २३ ऑगस्ट २०२४ रोजी प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेच्या शहर, पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील संबंधित विभागांमध्ये एकूण १५०० चेहरा पडताळणी यंत्रे उपलब्ध करण्याचे काम दोन कंत्राटदारांना देण्यात आले आहे.

## राज्यातील १९०० आरोग्य केंद्रातील सुरक्षा बाह्ययंत्रणेच्या हाती? वेतनातील तफावतीमुळे सुरक्षा मंडळे बाद

■ **मुंबई : नितीन देवळेकर**

डॉक्टरांवरील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात सुमारे सहा हजार सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत गेल्या दोन-तीन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला असून सुरक्षेची मदार मात्र बाह्ययंत्रणेवर सोपविली जाण्याची चिन्हे आहेत. शासनमान्य सुरक्षा मंडळ किंवा माजी सैनिक महामंडळ (मेस्को) यांच्यामार्फत सुरक्षा रक्षक उपलब्ध न झाल्यास बाह्ययंत्रणेद्वारे ई निविदा प्रक्रिया राबवून सुरक्षा रक्षक नेमावेत असे स्पष्ट करण्यात आले असले तरी प्रत्यक्षात सुरक्षा रक्षकांचे वेतन व इतर अटी पाहता शासनमान्य सुरक्षा मंडळाना सुरक्षा रक्षक पुरविणे अशक्य होणार आहे. त्यामुळे साहजिकच बाह्ययंत्रणेद्वारे सुरक्षा रक्षकांची नियुक्ती होणार आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांतील १९०६ प्राथमिक आरोग्य केंद्रात कंत्राटी पद्धतीने बाह्ययंत्रणेद्वारे





किमान तीन सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याबाबत १ ऑगस्ट रोजी शासन निर्णय जारी करुन १०९ कोटींच्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या संदर्भात पहिला शासन निर्णय २५ जानेवारी रोजी जारी करण्यात आला होता. त्यावेळी रायगड, नाशिक, कोल्हापूर, जळगाव आणि नंदूरबार हे पाच जिल्हे वगळून २९ जिल्ह्यांसाठी सुरक्षा रक्षक नेमण्याचे प्रस्तावीत होते. १ जुलै रोजी रोजी त्यात सुधारणा करून ३४ जिल्ह्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांचा समावेश करण्यात आला. प्रत्येकी १६ हजार रुपये प्रति सुरक्षा रक्षक असे वेतन निश्चित करण्यात आले आहे. हे वेतन सुरक्षा रक्षकांना असणाऱ्या किमान वेतनापेक्षा खूपच कमी आहे. मुंबई, ठाणे, पुणे ही शहर तसेच उर्वरित राज्यात सुरक्षा रक्षकांची वेतनश्रेणी वेगवेगळी आहे. २२ ते २४ हजार रुपयांच्या घरात किमान वेतन मिळणे आवश्यक असतानाही ही १६ हजार रुपये वेतन निश्चित करण्यात आले आहे. याशिवाय ३०० ठिकाणी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्याचा तीन वर्षांचा अनुभव, एकल मनुष्यबळ पुरविल्याचे १०० कोटी रुपयांचे कार्यादेश आणि तीन वर्षात दोन हजार पेक्षा अधिक मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्याचा परवाना बंधनकारक अशाही अटी आहेत. या अटी म्हणजे बाह्ययंत्रणेला कंत्राट देण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

## ‘झोपु’ योजनेंतर्गत केलेले बांधकाम ‘झोपडपट्टीच’; निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत न्यायालयाकडून चिंता व्यक्त

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत (झोपु) बांधण्यात येणाऱ्या इमारतींची संरचना आणि निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत उच्च न्यायालयाने शुक्रवारी चिंता व्यक्त केली. तसेच, झोपु योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या इमारती म्हणजे एक प्रकारची उभी झोपडपट्टीच असल्याची टिप्पणी न्यायालयाने केली.झोपु प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम कौतुक किंवा स्तुती करण्यासारखे नाही. या इमारतींच्या एकमेकांच्या जवळ बांधलेल्या असतात. परिणामी, रहिवाशांना मोकळी हवा, पुरेशी जागा, योग्य सूर्यप्रकाश मिळत नाही व आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. झोपु योजनेंतर्गतही अशी घरे उपलब्ध केली जाणार असतील, तर झोपडीधारकांनी झोपडपट्टूयांमध्ये राहणे योग्य असल्याचा टोलाही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या



खंडपीठाने हाणला. तसेच, झोपु योजनेच्या नावाखाली झोपडीधारकांना उभ्या झोपडपट्टूयांमध्ये राहण्यास भाग पाडून त्यांच्या जगण्याच्या अधिकाराचे उल्लंघन होत असल्याचे ताशेरेही खंडपीठाने ओढले. त्याचवेळी, झोपु प्रकल्पातील दोन इमारतींमध्ये आवश्यक मोकळी जागा न सोडता केलेले बांधकाम, त्याचा दर्जा या गंभीर मुद्यांबाबत प्रतिवादींना भूमिका स्पष्ट करण्याचे आदेशही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरेसन यांच्या विशेष खंडपीठाने उपरोक्त टिप्पणी करताना दिले. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याच्या अंमलबजावणीबाबत सर्वोच्च न्यायालयानेही प्रश्न उपस्थित केला होता. त्याचप्रमाणे, कायद्याचा फेरआढावा घेण्याचे आदेश दिल्याकडे न्यायमूर्ती कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने लक्ष वेधले.

# ४५ हजार कोटींच्या प्रकल्पांना गती: आचारसंहितेपूर्वी पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन करण्याच्या हालचाली

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांच्या कामास सुरुवात करण्याचे राज्य सरकारचे नियोजन आहे. त्यानुसार पुणे वर्तुळाकार रस्ता, जालना-नांदेड द्रुतगती महामार्ग, पॉडटॅक्सी, कांजूरमार्ग कारशेडसह इतर कारशेडचे भूमिपूजन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही सर्व कामे ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाची असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन करण्याच्या दृष्टीने राज्य सरकार आणि संबंधित सरकारी यंत्रणांकडून हालचालींना वेग देण्यात आला आहे.

मुंबईतील पहिल्या भुयारी ‘मेट्रो ३’ मार्गिकेवरील आरे- बीकेसी या पहिल्या टप्प्यासह महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पातील दक्षिणेकडील मार्गिकेचे लोकार्पण आचारसंहितेपूर्वी, ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. याबरोबरच राज्यातील ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या प्रकल्पाच्या कामांनाही आचारसंहितेपूर्वी सुरुवात करून प्रकल्प प्रत्यक्षात मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती ‘एमएसआरडीसी’तील सूत्रांनी दिली. त्यानुसार




सुमारे ३० हजार कोटी रुपये खर्चाच्या पुणे वर्तुळाकार रस्त्यासह एमएसआरडीसीच्या अंदाजे १२ हजार कोटी रुपयांच्या जालना-नांदेड द्रुतगती महामार्गाचे भूमिपूजन करून कामाला सुरुवात करण्यात येणार आहे. एमएसआरडीसीतील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी यास दुजोरा दिला आहे. एमएसआरडीसीतील दोन महत्त्वाच्या प्रकल्पांच्या कामाला सुरुवात करतानाच दुसरीकडे आचारसंहितेपूर्वी मुंबई महानगर प्रदेशातील पायाभूत सुविधा प्रकल्पाचेही भूमिपूजन करण्याची शक्यता आहे. वांद्रे- कुर्ला संकुलातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवून वाहतुकीचा एक वेगवान पर्याय उपलब्ध करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) पॉडटॅक्सी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. १०१६.३८ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती ‘एमएमआरडीए’तील सूत्रांनी दिली. आचारसंहितेपूर्वी भूमिपूजन करून कामाला सुरुवात करण्याचे ‘एमएमआरडीए’चे नियोजन आहे. पंतप्रधानांच्या मुंबई दौऱ्यातच पॉडटॅक्सीचे भूमिपूजन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## भेसळयुक्त खाद्यतेल, मिरची पावडर, दुधाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई; सणासुदीनिमित्त अन्न व औषध प्रशासनाची मोहीम

■ **मुंबई : गणेश बागडे**

सणासुदीच्या काळात मिठाई आणि तत्सम अन्नपदार्थांच्या मागणीत होत असलेली वाढ लक्षात घेऊन त्यात भेसळ करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या पदार्थांची खातरजमा करून सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भेळ व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी गणेशोत्सवादरम्यान अन्न व औषध प्रशासन मुंबई विभाग व ठाणे कार्यालयाने एकत्रितरित्या विशेष मोहीम राबवली. या मोहिमअंतर्गत मुंबई विभागात एकूण ६० तपासण्या करण्यात आल्या व एकूण ७६ अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. सणासुदीच्या काळात खाद्यतेल, मिरची पावडर व दूध या अन्नपदार्थांवर अन्न व औषध प्रशासनाने जप्तीची



कारवाई केली. मिरची पावडरच्या वेष्टनावर कोणत्याही प्रकारचा मजकूर न छापल्याने किंवा लेबल न लावल्याने ७४८ किलो वजनाचा आणि २ लाख ८४ हजार २४० रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. तसेच कमी दर्जाचे आणि बनावट लेबल असलेले ७४४ किलोचे १ लाख ११ हजार ६०० रुपये किमतीचे रिफाईंड सूर्यफुल तेल जप्त करण्यात आले. मालाड पूर्व येथे दोन ठिकाणी धाडी टाकून विविध कंपन्याच्या पिशवीबंद दुधाचा १७ हजार २८ रुपये किमतीचा एकूण २८५ लिटर साठा जप्त करून नष्ट करण्यात आला. या सर्व खाद्यपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

# राष्ट्रीय महामार्गावर पादचारी पुलांची कामे अंतिम टप्प्यात, रस्ते ओलांडून होणारे अपघात रोखणार

**■ वसई : आकाश कांबळे**

मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर रस्ते ओलांडून प्रवास करताना अपघाताच्या घटना घडतात. अशा घटना रोखण्यासाठी दहा ठिकाणी पादचारी पूल तयार करण्याचे काम सुरू आहे. आतापर्यंत सात ठिकाणच्या पुलाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे.

मुंबई, ठाणे, वसई विरार, मीरा भाईंदर, पालघर यासह गुजरातला जोडणारा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गालगतच अनेक छोटे मोठे गाव पाडे आहेत. या भागातील नागरिकांना दळणवळणासाठी महामार्ग हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे गाव पाड्यात राहणाऱ्या नागरिकांना महामार्ग ओलांडून धोकादायकरित्या प्रवास करावा लागतो. आता महामार्गावर दिवसेंदिवस वाहनांची वर्दळ ही बेसुमार वाढली आहे. त्यामुळे महामार्गालगत राहणाऱ्या नागरिकांना रस्ते ओलांडून प्रवास करणे अधिकच जिकरीचे बनले आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थ्यांना रस्ते ओलांडून जाताना अडचणी येत असतात. यापूर्वीसुद्धा रस्ते ओलांडून प्रवास करताना अनेक घटना घडल्या आहेत. काही जणांचा मृत्यू झाला आहे. यासाठी ज्या ठिकाणी गाव पाडे आहेत त्यांना दोन्ही बाजूने ये जा करण्यासाठी पादचारी उड्डाणपूल तयार करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत होती. त्यानुसार राष्ट्रीय महामार्गावर महामार्ग प्राधिकरणातर्फे वर्सोवा पुलापासून ते पालघरच्या



अच्छाडपर्यंत दहा ठिकाणी पादचारी पूल तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विरार बावखळ टोकरेपाडा, वंगणपाडा नालासोपारा, शिवेचापाडा, कोल्ही चिंचोटी, ससूपाडा अच्छाड, जव्हार फाटा, दुर्वेस व अन्य दोन ठिकाणे यांचा समावेश आहे. यासाठी सुमारे ६९ कोटी रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे. ३५० ते ५०० मीटर लांबीचे हे पादचारी पूल आहेत. यापैकी सात पादचारी पुलांचे मुख्य मार्ग व दोन्ही बाजूंच्या उतार मार्गाचे स्ट्रक्चर पूर्णपणे तयार झाले आहे आहे. त्यातील जी काही अत्यावश्यक कामे आहेत ती अवघ्या एका महिन्यात पूर्ण केली जातील असे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे व्यवस्थापक सुहास चिटणीस यांनी सांगितले आहे. पादचारी पुलाचे काम सुरूच आहे. सात पूलाचे जवळपास काम पूर्ण झाले आहे. उर्वरित पुलाचे कामही लवकरच मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. महामार्गावरील जुन्या खानिवडे टोल नाक्याच्या जवळील भागातही मोठ्या संख्येने लोकवस्ती आहे. दररोज प्रतिभा विद्यामंदिर या शाळेतील विद्यार्थी, पलीकडे शेती वाडी असलेले गावकरी, हनुमान नगर पाड्यातील आदिवासी, कष्टकरी कामगार, तसेच दर सोमवारी भरणाऱ्या आठवडे बाजारात बाजारहाट करण्यासाठी येणारे खरेदीदार व विक्रेते हे आपला जीव धोक्यात घालून महामार्ग ओलांडून प्रवास करतात त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

# नेरुळ विभागात अनधिकृत झोपड्यांवर पालिकेची कारवाई

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

अनधिकृत झोपड्यांविरुद्ध नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत नेरुळ विभागात कारवाई केली. नेरूळ पूर्व येथील भगवान बाबा गार्डन, सेक्टर ९, नेरुळ ग्रीनलॉन्ड अपार्टमेंटजवळ



नवी मुंबई महापालिका जल उदंचन केंद्रासमोर भर रस्त्यात पदपथावर अनधिकृत झोपड्या वसवण्यात आल्या होत्या. त्या झोपडपट्ट्यांमधून अवैध व्यवसाय सुरू असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. या ठिकाणी रात्री २० ते २५ लोक पदपथावरच झोपत असल्यामुळे सर्वसामान्य महिलांना वाट काढणे कठीण झाले होते. त्याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांना सदर रहिवाशांचा त्रास सहन करावा लागत होता याबाबत विभागातील नागरिकांनीही तक्रारी केल्या होत्या. त्यामुळे अतिक्रमण विभागामार्फत या ठिकाणच्या अनधिकृत झोपड्या हटविण्याची कारवाई करण्यात आली असून सामान जप्त करण्यात आले आहे. जप्त केलेल्या सामानामध्ये पाच बॅग, सहा पाण्याचे जार, कपडे भरलेले बोचके, दगडी चुली, आठ ताडपत्री, ७ दोरखंड, दोन प्लायवूड टेबल, दोन सोफे, दोन बेड, तीन टेबल, सहा मोठे प्लायवूड, ३ लहान प्लायवूड, पाच बॅनर, छत्तीस बांबू, एक हिरवी जाळी, चार प्लास्टिक खुर्च्या असे सामान जप्त करून कोपरखैरणे क्षेपणभूमी येथे जमा करण्यात आले आहे.

# पनवेलच्या झोपडपट्टी पुनर्वसनाच्या महागृहनिर्माणाला गती

**■ पनवेल : सतिश सोनावणे**

पनवेल शहरातील पटेल व कच्छी मोहल्ला परिसरातील झोपडपट्टी पुनर्वसनातील महागृहनिर्माण प्रकल्प गाढी नदीपात्रापासून शंभर मीटर अंतरावर उभारण्यास अखेर नगरविकास विभागाने परवानगी दिल्याने तसेच विविध सरकारी विभागाच्या परवानग्या या महागृहनिर्माण प्रकल्पाला मिळाल्याने पनवेल शहराची वाटचाल खऱ्या अर्थाने झोपडपट्टी मुक्त शहराकडे होऊ लागली आहे. मागील काही महिन्यापासून या प्रकल्पाचे काम सूरु झाल्यानंतर थांबले होते. महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी यासाठी पुढाकार घेऊन शासनाच्या नगरविकास विभागाकडे केलेल्या पाठपुराव्यामुळे पनवेलच्या महागृहनिर्माणाला गती मिळाली आहे. पनवेल महापालिकेने झोपडपट्टी मुक्त शहराकडे वाटचाल करण्यासाठी पहिल्यांदा शहरातील झोपडपट्टी व त्यामध्ये राहणाऱ्या झोपडीवासियांचे सर्वेक्षण केले. संबंधित झोपडपट्टींच्या जागेवर तेथील झोपडीवासियांचे पुनर्वसन करण्यासाठी पालिकेचे तत्कालिन



सदस्यांनी सूरुवातीपासून सभागृहात आग्रह धरल्याने झोडपट्यांच्या परिसरातील महागृहनिर्माण योजने अंतर्गत केंद्र व राज्य सरकारच्या निधीतून झोपडीवासियांचे पुनर्वसन करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले. पालिकेचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांच्या कारकिर्दीत त्यासंदर्भात प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा निश्चित झाल्यानंतर राज्य व केंद्राची यासाठी मंजूरी मिळविण्यात आली. मंजूरीचा मोठा टप्पा पार पडल्यानंतर झोपड्यांमध्ये राहणाऱ्या झोपडीधारकांना उंच इमारतीमधील सदनिका देण्याचे स्वप्न पुर्ण होईल याबाबत उत्कंठा वाढली. महापालिकेने पहिल्या टप्यात शहरातील कच्छी व पटेल मोहल्ला या परिसरातील १६०३ झोपड्यांचे सर्वेक्षण करुन या झोपडी धारकांना सदनिका मिळण्यासाठी २८७ कोटी रुपयांचे महागृहनिर्माण योजनेचा प्रकल्पाचा निविदा प्रक्रिया पार पाडून ठेकेदार नेमला. परंतू या प्रकल्पातील काही झोपड्या गाढी नदीपात्रालगतच्या पूरप्रवण क्षेत्रात येत असल्याने संबंधित बांधकाम थांबविण्यात आले होते. परंतू या बांधकामाविषयी पनवेल पालिकेने नगरविकास विभागाच्या सचिवांकडे पत्रव्यवहार करुन संबंधित बांधकाम हे गाढी नदीपासून शंभर मीटर अंतरावर बांधत असून संबधित बांधकामाचे जोते हे पूरपातळीच्या ०.९५ मीटर उंचीवर ठेवले जात असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. तसेच झोपड्यांचे वेळीच पुनर्वसन न झाल्यास पूरसदृष्यस्थितीमध्ये झोपड्यांमधील रहिवाशांचे नूकसान होईल असेही पालिकेने स्पष्ट केल्याची माहिती पालिकेचे अतिरिक्त आयुक्त भरत राठोड यांनी दिली.

# बेकायदा फलकबाजीवर पालिकेची कारवाई; २ हजार ५१६ फलक हटवले

**■ नवी मुंबई : भावना जैन**

बेसुमार फलकबाजीने शहराचे विद्रूपीकरण केले जात आहे. गणेशोत्सव काळात



शहरभर फलकबाजी पाहायला मिळत होती. अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जनानंतरचा पालिकेने कारवाईचा सपाटा लावला असूनदोन दिवसांत जवळजवळ २५०० पेक्षा अधिक फलक पालिकेने हटवले आहेत. गणेशोत्सव काळात शहरातील चौकाचौकांत फलकबाजीला ऊत आल्याचे पाहायला मिळाले होते. त् परंतु पालिकेने गणेशोत्सवानंतर नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व विभागांत अनंत चतुर्दशीनंतर कारवाई केली आहे. पालिकेने दोन दिवसांत केलेल्या कारवाईत १८९३ छोटे ६२३ मोठे असे एकूण दोन हजार ५१६ फलकांवर कारवाई केली आहे.

पालिका क्षेत्रातील जाहिरातीचे बॅनर छपाई करून देणाऱ्या एकूण २२ प्रिंटिंग करणाऱ्या व्यावसायिकांना विभाग कार्यालयामार्फत लेखी सूचना देण्यात आल्या. नवी मुंबई महापालिकेच्या विभाग कार्यालयाची परवानगी असल्याशिवाय कोणत्याही प्रकारचे जाहिरात/बॅनर्स/पोस्टर्स छापू नयेत व तसे केल्यास त्यांना महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम ११९५ चे कलम ३ नुसार छपाई करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

# डोंबिवलीजवळील निळजे गावात पिशवीत लघुशंका करून फळ विक्री

**■ डोंबिवली : सचिन कदम**

डोंबिवली निळजे गाव हद्दीतील पलावा-लोढा हेवन बाजारपेठ भागातील शिवाजी चौक परिसरात एक फळ विक्रेता फळविक्रीच्या हातगाडीचा आडोसा घेऊन प्लास्टिकच्या पिशवीत लंघुशका करत आहे. लुघशंकेची पिशवी फळ विक्रीच्या प्लास्टिक खोक्यात कोंबून पुन्हा त्याच हाताने फळ विक्री करत असल्याची दृश्यचित्रफित समाज माध्यमांवर सामायिक झाली आहे.

या किळसवाण्या प्रकाराने डोंबिवली, पलावा, निळजे परिसरातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. समाज माध्यमांवर या फळ विक्रेत्याची दृश्याचित्रफित सामायिक होताच, मानपाडा पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन, या दृश्यचित्रफितीची सत्यता आणि संबंधित फळ विक्रेत्याचा शोध सुरू केला आहे.

निळजे गाव परिसरातील रहिवाशांनी सांगितले, पलावा, लोढा हेवन भागातील वस्ती वाढत असल्याने निळजे गाव हद्दीत बाजारपेठ वाढत आहे. गावदेवी चौक, शिवाजी चौक, पलावा चौक, लोढा हेवन



रस्त्यावर भाजी, फळ विक्रेते सकाळपासून ते रात्रीपर्यत या भागात विक्रीसाठी बसलेले असतात. या भागात सार्वजनिक स्वच्छतागृह नाही. त्यामुळे फळ, भाजी विक्रेते आजुबाजूची दुकाने, आडोसे घेऊन लघुशंका करतात. काही विक्रेते प्लास्टिक पिशवीत लघुशंका करून ती नंतर फेकून देत असावेत. पण, एक विक्रेता फळ विक्रीच्या हातगाडीचा आडोसा घेऊन प्लास्टिक पिशवीत लघुशंका करतो. आणि ती पिशवी नंतर फळ विक्रीच्या प्लास्टिक खोक्यात कोंबून ठेवतो. तेच लघुशंकेचे हात स्वच्छ न धुता फळ विक्रीसाठी वापरत असल्याचे दृश्यचित्रफितीमधून दिसत आहे. असे प्रकार दररोज होत असण्याची शक्यता रहिवाशांनी व्यक्त केली. हा प्रकार आता उघड झाला आहे. या किळसवाण्या प्रकाराविषयी डोंबिवली परिसरातील नागरिकांनी तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. याविषयी कल्याण डोंबिवली पालिका, पोलिसांनी या विक्रेत्यांना स्वच्छतेचे धडे देण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

# नाले बंदिस्त करून विकासकामे करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना चपराक; राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाच्या सुनावणी पत्रात महत्वाची निरीक्षणे

**■ ठाणे : तृप्ती गोरे**

**ठाणे शहरातील नैसर्गिक प्रवाहांच्या नाल्यांवर कॉंक्रीटचे आवरण टाकून त्यावर रस्ते, वाहनतळ, वाणिज्य गाळयांची उभारणी करण्याचे 'उद्योग' करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने एका प्रकरणात नोंदवलेल्या निरिक्षणांमुळे चपराक बसली आहे. नवी मुंबईतील ऐरोली उपनगरामधील अशाच एका खुल्या नाल्यावर स्लॅब टाकून बेकायदा बांधकाम केले जात असल्याची तक्रार एका याचिका कर्त्याने केली होती.**

या याचिकेवर सुनावणी करताना हरित न्यायाधिकरणाने अशाच पद्धतीच्या अनधिकृत आणि बेकायदा प्रकरणांबाबत विविध निरिक्षणे नोंदवताना हे नाले खुलेच असायला हवेत अस मत प्रदर्शन केल्याने यासंबंधीची सर्वच कामे यापुढे महापालिकांना आवरती घ्यावी लागणार आहेत.

मुंबई महानगर क्षेत्रातील विविध शहरांतील वाढती लोकसंख्या आणि या वाढत्या लोकसंख्येला अपुऱ्या पडणाऱ्या सोयीसुविधा सद्यस्थितीत मोठ्या समस्यां निर्माण करू लागल्या आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे आपसूकच वाढणारी वाहनांची संख्या आणि या वाहनांच्या पार्किंग साठी लागणारी जागा तसेच यांसह विविध विकासकामांच्या उभारणीसाठी लागणारी जागाच या शहरांमध्ये शिल्लक नसल्याचे अनेकदा विविध अहवालांमधून समोर आले आहे. यामुळे या शहरांचा गाडा हाकणाऱ्या या स्थानिक स्वराज्य संस्थाकडूनच अनेकदा शहरांतील खुल्या नाल्यांवर सिमेंट – कॉंक्रीटचे स्लॅब टाकून बांधकाम केल्याचे समोर आले आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातही याच पद्धतीने नाला बंद करून त्यावर स्लॅब




टाकून वाहनतळ उभारण्यात आले आहेत. तर कळव्यातही खुल्या नाल्यावर स्लॅब टाकून रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे. याच पद्धतीने नवी मुंबई महापालिकेच्या वतीने ऐरोलीतील सेक्टर – १४ येथे एका खुल्या नाल्यावर स्लॅ ब टाकून बांधकाम करण्यास सुरुवात केली असून हे बांधकाम जल कायदा आणि किनारा नियमन क्षेत्राच्या नियमात बसत नसून हे बांधकाम बेकायदा असल्याची तक्रार एका याचिकाकर्त्याने राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे याचिका दाखल केली होती.

या याचिकेवर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने नुकतीच सुनावणी घेतली असून पालिकेच्या या कारभारावर प्रश्न चिन्ह उपस्थित करणारे आणि पर्यावरणाच्या दृष्टीने अशा पद्धतीची बांधकामे कशी धोकादायक आहेत याबाबतची अनेक दाखले देत विविध निरीक्षणे नोंदवली आहेत. तर याच पद्धतीने काही वर्षापूर्वी नाल्यावर स्लॅब टाकून बांधकाम केल्याच्या प्रकरणात संबंधित प्रशासनाला नाला बंदिस्त करण्यासाठी करण्यात आलेले बांधकाम पाडण्याचे आदेश दिले असल्याचे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने सुनावणी पत्रात स्पष्ट केले आहे. तर हरित लवादाच्या या सूचनांमुळे नाले बंदिस्त करुन त्यावर विविध विकासकामांची आखणी करू पाहणाऱ्या आणि काही ठिकाणी अशा पद्धतीने पर्यावरणीय कायद्यांची पायमल्ली करत विकासकामे पुढे नेणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराला चांगलीच चपराक बसली असून अशा पद्धतीच्या बांधकामांवर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शहराला बेकायदा फेरीवाल्यांचा विळखा, वसई- विरार महापालिकेच्या दप्तरी केवळ १५ हजार फेरीवाले

**■ वसई : आकाश कांबळे**

वसई, विरार शहरात फेरीवाल्यांची संख्या प्रचंड वाढत असताना पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात केवळ शहरात १५ हजार १५६ इतकेच फेरीवाल्यांची नोंद करण्यात आली आहे. फेरीवाले रस्त्यावर, पदपथावर वाट अडवून बसत असल्याने वाहतूक व ये-जा करण्यास अडचणी निर्माण होतात. मात्र फेरीवाले बेसुमार असताना १५ हजारच फेरीवाले कसे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

शहरात मुख्य रस्ते, ये-जा करण्याचे मार्ग, छोट्या गल्ल्या, पदपथ जिथे जागा मिळेल तिथे फेरीवाले बस्तान मांडून आहेत. नागरिकांना वाहतूक कोंडी, ये जा करण्याच्या मार्गात अडथळे अशा विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. फेरीवाल्यांची समस्या लक्षात घेता त्यातून तोडगा काढण्यासाठी व फेरीवाले बसण्यासाठीची जागा निश्चित करण्यासाठी आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या अध्यक्षतेखाली पथविक्रेता समितीची बैठक पार



पडली होती. यात नऊ प्रभागात सर्वेक्षण करण्यात आलेल्या फेरीवाल्यांची यादी प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेऊन ती यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. फेरीवाल्यांचे बायोमेट्रिक पद्धतीने सर्वेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात शहरात केवळ १५ हजार १५६ फेरीवाल्यांची नोंदणी करण्यात आली असल्याचे पालिकेने सांगितले आहे. या सर्वेक्षणानंतर फेरीवाला धोरण, बसण्यासाठीच्या जागा, ना फेरीवाला क्षेत्र, नोंदणी प्रमाणपत्र या सर्व बाबी पूर्ण केल्या जातील असे महापालिकेने सांगितले आहे. मात्र शहरात फेरीवाल्यांची संख्या बेसुमार वाढली असताना पालिकेच्या दप्तरी केवळ १५ हजारच फेरीवाल्यांच्या नोंदी असल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.

नोंदणीकृत पथविक्रेत्यांची यादी महानगरपालिकेच्या नऊ प्रभाग समिती कार्यालयात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीमधील तपशीलाबाबत नागरिकांना सूचना व हरकती नोंदविण्यात येणार आहेत. याची अंतिम मुदत ३० सप्टेंबर असून नागरिकांना आपल्या सूचना व हरकती संबंधित प्रभाग समिती कार्यालयांमध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात देता येणार आहेत.

वसई विरारमध्ये फेरीवाल्यांची संख्या वाढतच आहे. विशेषतः ठिकठिकाणी नियमबाह्य पद्धतीने भरविल्या जात असलेल्या बाजारांमुळे शहरात वाहतूक कोंडी, अस्वच्छता, रोगराई, प्रदूषण इत्यादी समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. याशिवाय ये जा करण्याचे रस्ते, फुटपाथ ही गिळंकृत झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना ये जा करण्यास अडचणी निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. आधीच अपुरे रस्ते व जागा त्यात वाढते फेरीवाले यामुळे नागरिकांची कोंडी कायम राहणार आहे अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे. वसई विरार शहरात फेरीवाले मुख्य रस्ते, फुटपाथ, नाले अशा ठिकाणी बसत आहेत. त्यामुळे वाहतूक समस्येसह नागरिकांना ये जा करण्यास अडचणी येत आहेत. ही समस्या सुटावी यासाठी नगररचना विभागाच्या मदतीने फेरीवाला झोन तयार करून फेरीवाल्यांना विशिष्ट जागा उपलब्ध करून त्यांचे पुनर्वसन केले जाणार आहे असे सहायक आयुक्त सुखदेव दरवेशी यांनी सांगितले आहे.

# रास्त धान्यासाठी तीन तासांची रांग

**■ पनवेल: सतिश सोनावणे**

प्रती माणसी तीन किलो गहु आणि चार किलो तांदुळ सरकार मान्य रास्त धान्य दुकानातून मिळविण्यासाठी कुटूंबातील मोठ्यांसह लहानग्यांना रांगेत तासंतास ताटकळत उभे रहावे लागत आहे. तीन तासांपेक्षा अधिक वेळ रांगेत उभे राहूनच रेशनवरील धान्य मिळेल याची खात्री नसल्याने रहिवाशी संताप व्यक्त करत आहे. ही गोंधळाची स्थिती पनवेल महापालिका क्षेत्रातील कळंबोली उपनगरातील सरकार मान्य रास्त धान्य दूकान क्रमांक ३ वरील आहे. रेशनींगचे धान्य मिळविण्यासाठी संबंधितांनी केवायसी करणे गरजेचे असल्याने रेशन दूकानावरील पॉझमशीन व्यवस्थीत चालत नसल्याने अनेक मिनिटांचा खोळंबा होत आहे. रांगेत उभे राहिल्यानंतर धान्य मिळण्याची वेळ येते त्यावेळेस केवायसी नसल्यास त्या कुटूंबप्रमुखाला खाली हात परतावे लागत असल्याने सरकारचे नियम सर्वसामान्यांसाठीच का असा प्रश्न नागरिक विचारु लागले आहेत. रविवार असल्याने



घरातील कर्त्या व्यक्तीला सुट्टी असल्याने कळंबोली येथील सेक्टर १० मधील श्री कृष्णा हेरीटेज या इमारतीमधील गाळ्यामध्ये जीजाई महिला बचत गटाला रास्त धान्य वाटपासाठी रेशनदूकान दिले आहे. गणेशोत्सवात अनेक रहिवासी मूळ गावाहून परतल्यानंतर त्यांनी रेशन मिळविण्यासाठी या दूकानावर रविवारी सकाळपासून गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. नागरिकांची धान्य मिळविण्यासाठी एकच झुंबड असल्याने दूकानदाराची सुद्धा भंबेरी उडाली. रेशन दूकान क्रमांक ३ वर कळंबोली वसाहतीचा काही भाग असून कळंबोली गावातील ग्रामस्थांना सुद्धा आठवड्यातील दोन दिवस विभाजून दिले आहेत. तरी एकाच वेळी धान्य घेण्यासाठी रहिवाशी आल्याने तासंतास गर्दीत रहिवाशांना उभे रहावे लागत आहे. सरकारने धान्य वाटपाची सोय तंत्रशुद्ध व तातडीने करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

केवायसी करण्यासाठी ज्यांची नाव रेशनकार्ड मधे आहेत त्या सर्वांना दुकानात यावं लागणार असल्याचे सांगीतले जाते. आधारकार्ड घेऊन आणि कुटूंबातील सगळ्यांची बायोमेट्रीक होणार आहे. अंगठ्याचे ठसे.

# गिरगाव चौपाटीवर ड्रोन उडवणाऱ्या पाच जणांविरोधात गुन्हा, हरवलेली ३९ मुले कुटुंबियांकडे सुपूर्द

■ मुंबई : गणेश बागडे

गणेशोत्सवाच्या काळात गिरगाव चौपाटी येथे विनापरवागी ड्रोन उडवणाऱ्या पाच जणांविरोधात डी. बी. मार्ग पोलिसांनी गुन्हे दाखल केला. पोलिसांनी या कारवाईत तीन ड्रोन जप्त केले. गणेश विसर्जन सोहळा पाहण्यासाठी आलेली ५८ जण हरवले होते. त्यात ३९ मुलांचा समावेश होता. त्यांचा शोध घेऊन त्यांना कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात पोलिसांना यश आले.

गणेशोत्सवासाठी परवानगीशिवाय ड्रोन उडवण्यास बंदी घालण्यात आली होती. त्याबाबतचे आदेशही पोलिसांनी जारी केले होते. पण त्यानंतरही गिरगाव चौपाटीवर विनापरवानगी ड्रोनद्वारे चित्रीकरण केल्याप्रकरणी डी. बी. मार्ग पोलिसांनी दोन गुन्हे दाखल केले. या कारवाईत तीन ड्रोन जप्त करण्यात आले. तसेच ड्रोन उडवणाऱ्या पाच व्यक्तींविरोधात पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम २२३ व ३(५) अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत. पहिल्या कारवाईत पोलीस शिपाई कुश पाटील यांना गिरगाव चौपाटी परिसरात तीन व्यक्ती ड्रोन उडवताना सापडले. त्यांच्याकडे परवानगीबाबत विचारणा करण्यात आली. मात्र त्यांच्याकडे कोणतीही परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले. अखेर त्यांच्याविरोधात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. या कारवाईत एक ड्रोन जप्त करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत पोलीस



शिपाई अजरुद्दीन नगारजी यांना दोन व्यक्ती ड्रोन उडवत असताना सापडले. त्यांच्याविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून पोलिसांनी दोन ड्रोन जप्त केले. सुरक्षेच्या कारणावरून गणेशोत्सवापूर्वी मुंबई पोलिसांनी आदेश जारी करून परवानगीशिवाय ड्रोन उडवण्यावर बंदी घातली होती. याबाबतची माहिती प्रसारितही करण्यात आली होती. त्यानंतरही आरोपींनी परवानगीशिवाय ड्रोन उडवल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

गिरगाव परिसरात हरवलेल्या ५८ व्यक्तींचा शोध घेऊन त्यांची कुटुंबियांशी भेट घालून देण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यात ३९ लहान मुलांचा समावेश आहे. यात २ ते १७ वर्ष वयोगटातील मुलांचा समावेश आहे. याशिवाय १२ व्यक्तीही बेपत्ता झाल्या होत्या. त्यात ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश आहे. त्यांचीही कुटुंबियांसोबत भेट घालून देण्यात आली. त्यासाठी गिरगाव परिसरात नियंत्रण कक्ष उभारण्यात आले होते. तसेच ध्वनीक्षेपकाद्वारे हरवलेल्या व्यक्तींची माहिती कुटुंबियांपर्यंत देण्यात आली. तसेच छेडछाडीच्या घटना रोखण्यासाठीही गिरगाव परिसरात साध्या वेशात पोलीस तैनात करण्यात आले होते.

# '२२० वर्ष जुनी एशियाटिक सोसायटी ताब्यात घ्या', कर्मचाऱ्यांची मोदी सरकारकडे मागणी!

■ मुंबई : सम्यक कासारे

दक्षिण मुंबईतील हॉर्निमन सर्कल परिसरात दोन शतकांहून अधिक काळ दिमाखात उभ्या असलेल्या ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. व्यवस्थापकीय समितीचा उदासीन कारभार आणि अपुऱ्या निधीमुळे सोसायटी डबघाईला आली असून केंद्र आणि राज्य सरकारने वेळीच लक्ष घालून संस्था ताब्यात घ्यावी, अशी मागणी एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष कॉ. प्रकाश रेड्डी यांनी केली आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या या संस्थेची दुरावस्था आणि कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान याविषयी गुरुवारी पत्रकार परिषदेत कर्मचाऱ्यांनी माहिती दिली. एशियाटिक सोसायटीला 'राष्ट्रीय महत्त्वाची संस्था' हा दर्जा मिळायला



हवा होता, मात्र त्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात संस्थेची व्यवस्थापकीय समिती अपयशी ठरली आहे. व्यवस्थापकीय समितीची अकार्यक्षमता आणि पुरेशा निधीअभावी एशियाटिक सोसायटीतील ग्रंथालय आणि त्यातील दुर्मिळ पुस्तकांचे जतन करणे अशक्य झाले आहे. यातील काही दस्तावेजांचे अपुऱ्या देखभालीमुळे नुकसान झाले आहे. संस्थेचे भविष्य अंधारात आहे, असा आरोप रेड्डी यांनी केला आहे. सध्या एशियाटिक सोसायटीमध्ये २५ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतन दिले जाते, मात्र तेही वेतन पूर्ण दिले जात नाही, भत्ते दिले जात नाहीत, असा आरोप करत कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार वेतन देण्यात यावे, अशी मागणीही रेड्डी यांनी केली आहे.

# तबेल्यांच्या स्थलांतरास विरोध; आरे वसाहतीमध्ये जागा देण्याची दूध उत्पादक संघटनेची मागणी, पालिकेचे सरकारला पत्र

■ मुंबई : नितीन देवळेकर

मुंबईतील गाई, म्हशींचे गोठे, तबेले मुंबईबाहेर स्थलांतरित करण्यास दूध उत्पादकांच्या संघटनेने विरोध केला आहे. पालघरमधील दापचेरी येथे तबेले स्थलांतरित केल्यास मुंबईत दररोज ताजे दूध वितरित करणे शक्य होणार नाही. त्यामुळे आरे वसाहतीतच तबेल्यांना जागा द्यावी, उपनगरातील तबेल्यांमधील सुमारे दहा हजार जनावरे आरे दुग्ध वसाहतीत समायोजित करून घ्यावी, अशी मागणी दूध उत्पादक संघटनेने केली आहे. या प्रकरणी पालिका प्रशासनाने आता राज्य सरकारच्या दुग्ध व्यवसाय विकास विभागाला पत्र पाठवले आहे.

मुंबईत उपनगरात विविध ठिकाणी गाई, म्हशींचे तबेले आहेत. हे तबेले मुंबई शहराबाहेर स्थलांतरित करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने २००५ मध्ये घेतला होता. पालघर जिल्ह्यातील दापचेरी येथे हे सगळे तबेले स्थलांतरित करण्यात येणार होते. मात्र मुंबई दूध उत्पादक संघटनेने या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाच्या बाजूने निकाल दिला होता. त्यानंतर संघटनेने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र तिथेही संघटनेच्या विरोधात निकाल लागला. त्यामुळे हे तबेले शहराबाहेर नेण्याच्या निर्णयावर



शिक्कामोर्तब झाले होते. मात्र हा निकाल येऊन तीन – चार वर्षे झाली तरी तबेले अजूनही मुंबईतच आहेत. त्यामुळे राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विभागाने पालिकेकडे मदत मागितली होती. तबेले हटवण्यासाठी राज्य सरकारच्या संबंधित विभागाकडे पुरेशी यंत्रणा नसल्यामुळे पालिकेने हे तबेले हटवावे अशी मागणी पालिका प्रशासनाकडे केली होती. त्यानुसार पालिकेने मुंबईतील तबेल्यांचे सर्वेक्षण केले व तबेल्यांना नोटिसा पाठवल्या होत्या. पूर्व आणि पश्चिम उपनगरात २६४ तबेले असून त्यामध्ये सुमारे दहा हजार जनावरे आहेत.

पालिकेने या तबेल्यांना नोटीस पाठवल्यानंतर दूध उत्पादक संघटनेचे (मिल्क प्रोड्युसर असोसिएशन) म्हणणे ऐकून घेण्यासाठी गेल्या महिन्यात पालिका प्रशासनाने एक बैठक बोलावली होती. या बैठकीत दूध उत्पादक संघटनेच्या प्रतिनिधींनी आपली बाजू मांडली. दापचेरी येथील जागा दुधाच्या व्यवसायासाठी योग्य नाही, तेथून दररोज मुंबईत दूध आणणे व विकणे परवडणारे नाही. त्यामुळे आरे वसाहतीतच या तबेल्यांना सामावून घ्यावे, अशी मागणी या संघटनेने केली. तबेल्यांमधील शेण, मलमूत्र रेल्वे रुळाजवळ किंवा नदी-नाल्यात सोडले जात असल्याची तक्रार अनेकदा केली जाते. तसेच तबेल्यांमधील जनावरे अन्नाच्या शोधात शहरात फिरत असतात. त्यामुळे शहरात वाहतूक कोंडीच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

# अर्थसहाय्यासह अल्पवयीन पीडितांचे समुपदेशन करणे सरकारचे कर्तव्य, उच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

■ मुंबई : राकेश गायकवाड

लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यांतर्गत (पोक्सो) दाखल गुन्ह्यातील अल्पवयीन पीडितांना आर्थिक आणि वैद्यकीय सहाय्य देण्यासह त्यांना या मानसिक धक्क्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांचे समुपदेशन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे, असे उच्च न्यायालयाने गुरूवारी स्पष्ट केले. तसेच, पीडिता किंवा त्यांच्या कुटुंबियांना मदतीसाठी उच्च न्यायालयाची पायरी चढावी लागणार नाही याची काळजी घेण्याचेही न्यायालयाने सरकारला बजावले.

साकीनाका येथील चार वर्षांच्या मुलीवर अल्पवयीन मुलाने केलेल्या लैंगिक अत्याचाराप्रकरणी दाखल याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती रेवती डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला त्यांच्या कर्तव्याची आठवण करून दिली. तसेच, साकीनाका प्रकरणातील अल्पवयीन पीडितेच्या समुपदेशनाचे काय ? तिचे आणि तिच्या पालकांचे समुपदेशन केले का ? अशी विचारणा न्यायालयाने केली. त्याचप्रमाणे या प्रकरणातील बाल कल्याण समिती व महिला आणि बालकल्याण विभागाच्या भूमिकेवरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. बालकल्याण समितीने या प्रकरणात काय पावले उचलली ते सांगा, असे विचारताना पोक्सोंतर्गत दाखल गुन्ह्यातील पीडितांचे



सरकारकडून समुपदेशन आणि पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचेही अधोरेखीत केले. पोक्सो कायद्यांतर्गत प्रत्येक पीडितेला आर्थिक आणि वैद्यकीय मदत मिळायला हवी. परंतु, त्यासह त्यांना मानसिक आधार देण्यासाठी पीडितांचे समुपदेशन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले. पोक्सो प्रकरणांमध्ये पीडितांचे जबाब त्वरीत नोंदवणे कायद्याने बंधनकारक असल्याचे न्यायालयाने मागील सुनावणीच्या वेळी म्हटले होते. तसेच, साकीनाका पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, गुन्हा नोंदविण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस उपायुक्तांनी ९ सप्टेंबर रोजी नोटीस बजावल्याची माहिती मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाला दिली. तसेच, पीडितेचा जबाब ९ सप्टेंबर रोजी नोंदवल्याचेही सांगितले. त्यावर, हे प्रकरण पोक्सोअंतर्गत येत असूनही प्रकरणाची प्रक्रिया जलद करण्यासाठी पोलिसांनी काहीच केले नसल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

# आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल! 'महायुतीचं सरकार पराभवाला घाबरतंय, त्यामुळेच...'

■ मुंबई : यश सावंत

'गेली दोन वर्षे महाराष्ट्रातील भाजप – शिंदे राजवटीने मुंबई विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर गटाची अधिसभा निवडणूक रोखण्याचे प्रयत्न केले. त्यांना जितकी पराभवाची भीती, तितकीच शिक्षणाचीही भीती वाटते. त्यांची बहुतेक मुले परदेशात शिकतात किंवा परदेशात व्यवसाय करतात, मात्र हे आम्हाला व्हॉट्सॲपद्वारे भीती दाखवून लढण्यात व्यस्त ठेवतात. त्यांना शिक्षण, आहे. रविवार, २२ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान आणि बुधवार, २५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता फोर्ट संकुलातील सर कावसजी जहांगीर दीक्षान्त सभागृहात मतमोजणी करून निकाल जाहीर करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर विजय प्राप्त करण्यासाठी विद्यार्थी संघटनांनी कंबर कसली असून विविध माध्यमातून प्रचार सुरू आहे. आदित्य ठाकरे यांनीही नोंदणीकृत पदवीधर मतदारांना




शैक्षणिक सुधारणा आणि त्यातील बदलांची भीती वाटते, गुणवत्तापूर्ण शिक्षणाबाबत केलेला खोटा प्रचार उघडे पाडेल, त्यावरच त्यांचे निवडणूक जिंकणे अवलंबून असते', असा हल्लाबोल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते व युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांनी विरोधकांवर केला.

निवडणुकीला रातोरात स्थगिती, मतदारयादीवर आक्षेप, राजकीय आरोप – प्रत्यारोप, न्यायालयातील लढाई, लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता आदी विविध कारणांमुळे मुंबई विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर गटाची अधिसभा निवडणूक लांबणीवर पडली. अखेर तब्बल दोन वर्षांनंतर ही निवडणूक होत पत्र पाठवून युवा सेनेच्या सर्व उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. तसेच या पत्रातून त्यांनी महायुती सरकारवर जोरदार टीकाही केली आहे. हे पत्र युवा सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते घरोघरी जाऊन नोंदणीकृत पदवीधर मतदारांना देत आहेत. 'मुंबई विद्यापीठातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि प्रत्येक विद्यार्थ्याला सर्वतोपरी मदत करण्यासाठी वचनबद्ध आहोत', असे आदित्य ठाकरे यांनी पत्रात नमुद केले आहे. ठाकरे गटाची युवा सेना आणि अभाविपमध्ये थेट लढत नोंदणीकृत पदवीधर गटाच्या निवडणुकीच्या रिंगणात एकूण १० जागांसाठी २८ उमेदवार उभे आहेत.

# पत्राचाळीतील २,३९८ घरांच्या बांधकामाच्या निविदेला मुदतवाढ, अपेक्षित प्रतिसादाअभावी मुंबई मंडळाचा निर्णय

■ मुंबई : गणेश बागडे

गोरेगाव पश्चिम येथील सिद्धार्थ नगर (पत्राचाळ) वसाहतीच्या पुनर्विकासाअंतर्गत म्हाडाच्या मुंबई मंडळाला उपलब्ध झालेल्या चार भूखंडांवर २३९८ घरे बांधण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. या घरांच्या बांधकामासाठी ऑगस्टअखेरीस निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत शुक्रवारी (आज, २० सप्टेंबर) संपुष्टात येणार होती. मात्र अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने निविदेस सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

वादग्रस्त पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्प ताब्यात आल्यानंतर मंडळाने अपूर्ण पुनर्वसित इमारती आणि २०१६ च्या सोडतीतील ३०६ घरांचा समावेश असलेल्या अपूर्ण इमारतींचे बांधकाम हाती घेतले. ही कामे आता पूर्ण आली आहेत. त्यामुळे मंडळाला उपलब्ध झालेल्या प्रकल्पातील चार भूखंडांवर गृहप्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाप्रमाणे आर-१, आर-



७, आर-४ आणि आर-१३ या भूखंडांवर एकूण २,३९८ घरे बांधण्यात येणार आहेत. अल्प गटासाठी १,०२३ घरे, उच्च गटासाठी १३३ घरे आणि मध्यम गटासाठी १,२४२ अशी एकूण २३९८ घरांचा त्यात समावेश असणार आहेत. ही घरे ४० मजली चार इमारतींमध्ये असणार असून या घरांचे क्षेत्रफळ ४७३ चौरस फूट ते १००० चौरस फूट असणार आहे. अशा या घरांच्या बांधकामासाठी ३० ऑगस्टला मंडळाने निविदा प्रसिद्ध केली होती. या निविदेप्रमाणे २० सप्टेंबरपर्यंत इच्छुक विकासक कंपन्यांना निविदा सादर करता येणार होत्या. पण ही २० सप्टेंबरची मुदत संपुष्टात येण्याआधीच, एक-दोन दिवसांपूर्वीच या निविदेला मुदतवाढ देण्यात आली. निविदेस अपेक्षित प्रतिसाद नसल्याने निविदेस सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी दिली.

मुदतवाढीप्रमाणे आता २६ सप्टेंबरपर्यंत कंपन्यांना निविदा सादर करता येणार आहेत. या मुदतीत तरी निविदेस अपेक्षित प्रतिसाद मिळतो का याकडे मंडळाचे लक्ष लागले आहे.

# ठाणे जिल्ह्यात म्हाडाला मिळणार सुमारे १४०० घरे?

■ मुंबई : नितीन देवळेकर

म्हाडाच्या कोकण मंडळाला लवकरच ठाणे जिल्ह्यात विविध ठिकाणची अंदाजे १,४१९ घरे उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ही घरे २० टक्के सर्वसमावेशक योजना आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील असून या घरांसंबंधीचे प्रस्ताव विकासकांकडून मंडळाला प्राप्त झाले आहेत. त्यानुसार लवकरच पुढील प्रक्रिया पूर्ण करून ही घरे मिळविण्यात येणार असून या घरांचा कोकण मंडळाच्या आगामी सोडतीत समावेश करण्यात येणार आहेत.

आचारसंहिता जारी होण्यापूर्वी अंदाजे ७००० घरांच्या सोडतीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्याचे नियोजन कोकण मंडळ करीत आहे. ही जाहिरात ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या सोडतीत २० टक्के आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील अंदाजे १,४१९ घरांचा समावेश असणार आहे. ठाणे महानगरपालिका, कल्याण – डोंबिवली महानगरपालिका आणि वसई – विरार महानगरपालिका क्षेत्रातील २० टक्के योजनेतील १९ प्रस्ताव कोकण मंडळाकडे




सादर झाले आहेत. या घरांची एकूण संख्या ५९४ इतकी आहे. कौसा येथील स्कायलार्क इन्फ्रा समूहाच्या प्रकल्पातील ४३ घरे, गोळवलीतील सनराज समूहाच्या प्रकल्पातील २८ घरे, चितळसरमधील महावीर समूहाच्या प्रकल्पातील २७ घरे, बाळकुममधील दोस्ती समूहाच्या प्रकल्पातील ४९ घरे, जोतिसगाव येथील गौरी विनाय बिल्डर्सच्या प्रकल्पातील ६४ घरे, कल्याणमधील थारवानी समूहाच्या प्रकल्पातील १४ घरे, कोलशेत येथील डीडी असोसिएट समूहाच्या प्रकल्पातील २४ घरे, टिटावाळा येथील थारवाणी समूहाच्या प्रकल्पातील ४१ घरांसह अन्य घरांचा यात समावेश आहे.

ठाण्यातील २० टक्क्यातील ५९४ घरांसह डोंबिवली येथील रुणवाल समूहाच्या प्रकल्पातील ८२५ घरेही कोकण मंडळाला उपलब्ध होणार आहे. ही घरे १५ टक्के एकात्मिक योजनेतील असून ही घरे मंडळाकडे वर्ग करण्यासंबंधीचा प्रस्तावही मंडळाकडे आला आहे. आता पुढील कार्यवाही करून ही १४१९ घरे मंडळाच्या आगामी सोडतीत समाविष्ट करण्यात येणार आहेत. ही घरे अत्यल्प आणि अल्प गटातील असून ३०० ते ५०० चौरस फुटांची आहेत. तर या घरांच्या किंमती २० ते ३० लाख रुपये असण्याची शक्यता आहे. या घरांचा सोडतीत समावेश करण्यासंबंधीची कार्यवाही मंडळाकडून सुरू आहे.

# देशातील नागरिक मूर्ख वाटतात का ? 'इमर्जन्सी' चित्रपटाच्या प्रदर्शन प्रमाणपत्रावरून उच्च न्यायालयाची सेन्सॉर मंडळाला विचारणा

■ मुंबई : सम्यक कासारे

चित्रपटांमध्ये दाखवल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर आंधळेपणाने विश्वास ठेवण्याएवढे देशातील नागरिक मूर्ख वाटतात का ? सर्जनशील, काल्पनिक स्वातंत्र्याचे काय ? अशी प्रश्नांची सरबत्ती उच्च न्यायालयाने अभिनेत्री कंगना राणावत हिच्या 'इमर्जन्सी' या चित्रपटाच्या निमित्ताने गुरूवारी सेन्सॉर मंडळाला केली. तसेच, या चित्रपटाला प्रदर्शन प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करण्याच्या मंडळाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली व आठवडाभरात या प्रकरणावर निर्णय घेण्याचे आदेश दिले. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याच्या भीतीपोटी सेन्सॉर मंडळ वैयक्तिक आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणून चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यास नकार देऊ शकत नाही. चित्रपट प्रदर्शनाबाबत सेन्सॉर मंडळाला निर्णय घ्यावाच लागेल. परंतु, चित्रपट प्रदर्शित करता येणार नाही, असे मंडळाचे म्हणणे असेल तर त्याबाबतचे योग्य ते स्पष्टीकरण पुढील सुनावणीपर्यंत देण्याचे न्यायमूर्ती बर्गिस कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने सेन्सॉर मंडळाला बजावले.

तत्पूर्वी, चित्रपटाबाबतच्या अंतिम निर्णयासाठी सेंन्सॉर मंडळाच्या अध्यक्षांनी हा चित्रपट फेरविचार समितीकडे पाठवला असल्याची माहिती मंडळाच्या वतीने वकील अभिनव चंद्रचूड यांनी न्यायालयाला दिली.




चित्रपटात धार्मिक भावना चिथवणारी काही दृश्य आणि संवाद आहेत. त्यामुळे, समाजात गोंधळ, अराजकता निर्माण होऊ शकते. म्हणूनच, चित्रपटाच्या प्रदर्शनाबाबत समितीकडून अद्यापही विचारविनिमय सुरू असल्याचे मंडळातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. मात्र, हा निव्वळ वेळकाढूपणा आहे. हरियाणामध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे, ऑक्टोबरपूर्वी चित्रपट प्रदर्शित होणार नाही याची काळजी घेतली जात असल्याचा दावा चित्रपटाचे सहनिर्माते झी एंटरटेनमेंटच्या वतीने वरिष्ठ वकील व्यंकटेश धोंड यांनी केला. त्यावर, मंडळाने न्यायालयाच्या आधीच्या आदेशाचे पालन केलेले नाही आणि फक्त एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे प्रकरण वर्ग केले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, म्हणून चित्रपटाला प्रमाणपत्र न देण्याच्या निष्कर्षावर येणे हे मंडळाचे काम नाही, ते काम राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनाचे आहे, अशा शब्दात न्यायालयाने सेन्सॉर मंडळाची कानउघाडणी केली. दरम्यान, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जीवनावर आधारित 'इमर्जन्सी' चित्रपटाला शिरोमणी अकाली दलासह शीख संघटनांनी आक्षेप घेतला त्यातच, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शीख समुदायाचे आक्षेप विचारात घेण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे, चित्रपटाचे प्रदर्शन रखडले आहे.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# केंद्र सरकारला उच्च न्यायालयाचा तडाखा, सत्यशोधन समिती स्थापन करण्याबाबतची कायदादुरूस्ती घटनाबाह्य ठरवून रद्द

■ मुंबई : नितीन देवळेकर

**सरकारविरोधात समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या या संत्यशोधन समितीच्या माध्यमातून खऱ्या - खोट्या ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. तसेच हा अधिकार केंद्र सरकारला देणारी माहिती - तंत्रज्ञान कायद्यातील दुरुस्ती न्यायालयाने घटनाबाह्य ठरवून रद्द केली.**

ही कायदा दुरूस्ती घटनाविरोधी असून ती राज्यटनेने दिलेल्या समानता, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह व्यवसाय करण्याच्या अधिकारांचे उल्लंघन करणारी असल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने हा निर्णय देताना प्रामुख्याने नोंदवले. ही कायदा दुरूस्ती योग्य की घटनाबाह्य याचा ३१ जानेवारी २०२४ रोजी निर्णय देताना न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या खंडपीठाने परस्परविरोधी निकाल दिला होता. न्यायमूर्ती पटेल यांनी याचिकाकर्त्यांचे म्हणणे मान्य करताना कायद्यातील दुरूस्ती बेकायदा ठरवून ती रद्द करण्याचा निकाल दिला होता. तर, न्यायमूर्ती गोखले यांनी मात्र सरकारविरोधात समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या खऱ्या – खोट्या ठरवण्याचा अधिकार सरकारला देण्याचा निर्णय योग्य ठरवला होता. न्यायमूर्ती पटेल आणि न्यायमूर्ती गोखले यांनी परस्परविरोधी निकाल दिल्याने या मुद्यावरील बहुमतासाठी प्रकरण न्यायमूर्ती अनिल चांदूरकर यांच्या एकलपीठाकडे वर्ग करण्यात आले होते. न्यायमूर्ती चांदूरकर यांनी न्यायमूर्ती पटेल यांच्या मताशी सहमती दर्शवत आणि दोनास एक असा बहुमताचा निर्णय देताना सुधारित माहिती- तंत्रज्ञान नियम रद्दबाबतल ठरवला. आपण या प्रकरणाचा विस्तृतपणे विचार केला आहे. त्यानुसार, सरकारविरोधात समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या खऱ्या – खोट्या ठरवण्याचा अधिकार केंद्र सरकारला देणारी कायदा दुरूस्ती ही राज्यघटनेने दिलेल्या उपरोक्त मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी असल्याचे स्पष्ट होते, असे एकलपीठाने निकालात म्हटले. शिवाय, कायद्यातील सुधारित तरतुदी अस्पष्ट असून त्यांचा केवळ एखाद्या व्यक्तीवरच नव्हे तर समाजमाध्यम मध्यस्थ कंपन्यांवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, ही प्रस्तावित कायदा दुरूस्ती रद्द करण्यात येत असल्याचे न्यायमूर्ती चांदूरकर यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. कायदा दुरूस्तीत बनावट, खोटे आणि दिशाभूल करणारा या तिन्ही शब्दांची



देणारी हास्यकलाकार कुणाल कामरा याच्यासह संपादक आणि नियतकालिकांच्या संघटनांनी केलेल्या याचिका एकलपीठाने योग्य ठरवल्या. तसेच, न्यायमूर्ती पटेल यांच्या निकालाशी आपण सहमत असून नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकारांचे संरक्षण करण्याच्या गरजेवर न्यायमूर्ती चांदूरकर यांच्या एकलपीठाने भर दिला. सरकारविरोधात समाजमाध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या खऱ्या – खोट्या ठरवण्याचा अधिकार कायदा दुरूस्तीद्वारे केंद्र सरकारला दिल्यास नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर परिणाम होईल, असे नमूद करताना हेही कारण सुधारित नियम रद्द करण्यासाठी ग्राह्य धरण्यात आल्याचे त्यांनी निकालात म्हटले.

**म्हणून न्यायमूर्ती पटेल यांच्या निकालाशी सहमती**

सत्य माहिती मिळण्याचा अधिकाराचा अभिव्यक्ती व भाषण स्वातंत्र्यात समावेश होत नाही. तसेच, सत्यशोधन समितीने खरी ठरवलेली माहितीच नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी सरकारची नाही. त्यामुळे, कायद्याचा आधार घेत ती स्वीकारार्ह ठरवता येणार नसल्याचे महत्त्वपूर्ण निरीक्षणही एकलपीठाने कायदा दुरूस्ती घटनाबाह्य ठरवताना नोंदवले. एवढ्यावरच न थांबता, समाजमाध्यमावरून किंवा डिजिटल व्यासपीठावरून प्रसिद्ध होणारा मजकूर खोटा, बनावट असल्याची पडताळणी करण्याचा निर्णय विवेकी नसल्याचेही एकलपीठाने निकालात म्हटले. सरकार किंवा सरकारच्या कामाविरोधातील मजकूर खरा अथवा खोटा आहे हे पडताळण्यासाठी सरकराने सत्यशोधन समिती स्थापन केली. परंतु, ही समिती सरकारने स्थापन केली असल्याने तिचा निर्णय एकतर्फी असू शकतो हेही एकलपीठाने याचिकाकर्त्यांची आणि न्यायमूर्ती पटेल यांनी व्यक्त केलेली भीती योग्य ठरवताना अधोरेखीत केले. ऑनलाईन मजकूर खरा की खोटा ठरवणाऱ्या सत्यशोधन समितीची वस्तुस्थिती कोण तपासणार ? असा प्रश्न उपस्थित करून न्यायमूर्ती गौतम पटेल यांनी सुधारित नियम घटनाबाह्य ठरवले होते व रद्द केल्याचा निकाल दिला होता. तसेच, मूलभूत अधिकार कमी करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाला विरोध केला पाहिजे. या दुरूस्तीचा सगळ्यात भयावह चेहरा म्हणजे ती एकतर्फी आहे. सरकार बळजबरीने भाषणाचे खरे किंवा खोटे असे वर्गीकरण करू शकत नाही आणि नंतर ते अप्रकाशित ठेवण्यास भाग पाडू शकत नाही. ही एकप्रकारे सेन्सॉरशिप आहे, असेही न्यायमूर्ती पटेल यांनी त्यांच्या निकालात अधोरेखीत केले होते. दुरूस्तीने केंद्र सरकारला मजकूर खोटे, दिशाभूर करणारा ठरवण्याचा पूर्ण अधिकार दिला असून तो त्यांच्यासाठी आहे ही बाब त्रासदायक असल्याचे न्यायमूर्ती पटेल यांनी नमूद केले होते.

# राहुल गांधींना जीवे मारण्याचा भाजपाचा मानस

■ भाईंदर : यश सावंत

काँग्रेस नेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याचा भाजपाचा मानस आहे. त्यामुळे गांधी विरोधात देशभरात वातावरण निर्माण करण्याचे काम महायुतीमार्फत केले जात असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. मिरा भाईंदरमध्ये पक्षाच्या कोकण विभागीय मेळाव्यात ते बोलत होते. मागील पंचाहत्तर वर्ष काँग्रेसने देशात संविधानाचे वातावरण निर्माण करून ठेवले होते. म्हणूनच एक चहा विकणारा व्यक्ती देशाचा पंतप्रधान होऊ शकला. मात्र भाजपा सत्तेत आल्यापासून संविधानाला धोका निर्माण झाला आहे. त्यात राहुल गांधी जातनिहाय जनगणना करण्याची मागणी करत असल्यामुळे त्यांना धमकवण्याची भाषा सर्वत्र सुरू आहे. मात्र गांधी हे संविधानाच्या मार्गानेच




आणि सत्य बोलत आहेत. त्यामुळे गांधींना धमकवणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. आणि याबाबतचा खुलासा खुद्द नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी करावा, अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे. आज राज्यात शेतकऱ्यांची अंत्यत वाईट अवस्था आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे तो आंदोलन आणि निवेदने देऊन सरकारपुढे आपली समस्या मांडत आहे. नुकतीच काही शेतकऱ्यांनी आपल्या रक्ताने स्वाक्षरी केलेली निवेदने मुख्यमंत्री ताफ्यात घुसून दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र शेतकऱ्यांच्या व्यथा समजून घेण्याऐवजी गुन्हे दाखल केले जात आहेत. तसेच त्यांना आतंकवादीसारखी उपमा देऊन सरकार बदनाम करत आहे. त्यामुळे सरकारच्या या भूमिकेबाबत आता अन्नदाता शांत बसणार नाही. सरकारला देखील हे चांगलेच ठाऊक झाले असून कडेकोट बंदोबस्त घेऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री फिरत आहेत. परंतु निवडणुका घोषित झाल्यावर मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी असे फिरून दाखवावे, असे आव्हान एकप्रकारे पटोळे यांनी दिले. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला या भाजपाचेच काम करतात असा आरोप पटोले यांनी केला आहे. आज राज्यात महिला पोलिसांचा देखील वारंवार अपमान होत आहे.

# तिसऱ्या, चौथ्या मार्गिकेवरुन एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांची वाहतुक सुरूच

■ ठाणे : तृप्ती गोरे

मध्य रेल्वे प्रशासनाने ठाणे ते दिवा पाचवी आणि सहावी मार्गिका एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्रपणे उपलब्ध करून दिली असली तरीही अनेक एक्स्प्रेसगाड्या या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकांवरून धावत आहे. या रेल्वे रुळांलगत असलेल्या रहिवाशांच्या एक्स्प्रेसगाड्यांच्या आवाजामुळे कानठळ्या बसू लागल्या आहेत. वृद्ध, रुग्ण या प्रकारामुळे त्रस्त झाले असून यातून केव्हा सुटका मिळेल अशी विचारणा करू लागले आहेत. उपनगरीय रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीवर ही त्याचा परिणाम होत असल्याचे प्रवासी संघटनांचे म्हणणे आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी येथील रहिवाशांनी वारंवार मध्य रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला. परंतु त्यांना सकारात्मक परिणाम दिसून येत नाही असे येथील रहिवाशांचे म्हणणे आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने ठाणे ते दिवा रेल्वे स्थानका दरम्यान दोन मार्गिकांचे लोकार्पण फेब्रुवारी २०२२ मध्ये करण्यात आले होते. त्यानंतर यातील नव्याने तयार करण्यात आलेल्या मार्गिकांवरून धिम्या उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक होते. पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या रेल्वे मार्गिकांवरून जलद उपनगरीय



रेल्वेगाड्यांची वाहतुक होते. तर, पारसिक बोगद्यातील मार्गिका पाचवी आणि सहावी मार्गिका ओळखली जात आहे. पाचव्या आणि सहाव्या मार्गिका या मालगाड्या आणि एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांसाठी स्वतंत्रपणे उपलब्ध असतील असा दावा मध्य रेल्वे प्रशासनाकडून केला जात होता. परंतु पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेसह तिसऱ्या- चौथ्या मार्गिकांवरूनही एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांची वाहतुक होत आहे. त्यामुळे उपनगरीय रेल्वे वाहतुकीवर त्याचा परिणाम होऊ लागला आहे. एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांच्या वाहतुकीमुळे जलद उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतुक खोळंबते असे प्रवाशांचे म्हणणे आहे. तर, खारेगाव, कळवा, पारसिक भागात मोठ्याप्रमाणात लोकवस्ती आहे. येथील रहिवासी आता या एक्स्प्रेस गाड्यांच्या वाहतुकीने हैराण झाले आहेत. एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांच्या कानठळ्या बसविणाऱ्या आवाजामुळे येथील वृद्धांना आणि रुग्णांना अधिक त्रास सहन करावा लागतो. रात्रीच्या वेळेतही एक्स्प्रेसगाड्यांची वाहतुक होत असते. त्यामुळे आवाजाची पातळी वाढते असे रहिवाशांचे म्हणणे आहे. मध्य रेल्वे प्रशासनाला विचारले असता, त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# डोंबिवलीत मोबाईल वापरण्यास दिला नाही म्हणून तरूणीची आत्महत्या

■ डोंबिवली : सतिश सोनावणे

आईने मोबाईल हाताळण्यास दिला नाही म्हणून राग अनावर झालेल्या डोंबिवलीतील देसलेपाडा




भागातील लोढा हेरिटेज भागातील एका १९ वर्षाच्या तरूणीने गुरुवारी रात्री राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने लोढा हेरिटज परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. संजना हेमांगी झोरे असे मयत तरुणीचे नाव आहे. आई हेमांगी झोरे यांनी यासंदर्भात मानपाडा पोलीस ठाण्यात माहिती दिल्यानंतर पोलिसांनी अकस्मित मृत्युची नोंद केली आहे. आई हेमांगी आणि मयत मुलगी हे कुटुंब देसलेपाडा येथील लोढा हेरिटेजमधील एका गृहसंकुलात राहते. मयत मुलीची आई हेमांगी या नोकरी करतात. मयत मुलगी शिक्षण घेत होती. तिने मोबाईलवर वेळ घालविण्यापेक्षा अभ्यास करावा, असे आईचे मत होते. त्यामुळे आई तिला मोबाईल वापरापासून प्रतिबंध करत होती. गुरुवारी रात्री आई, मुलगी दोघी घरात होत्या. रात्री साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान मयत मुलीने आईकडे मोबाईल हाताळण्यास मागितला. त्यावेळी आईने मोबाईलपेक्षा अभ्यास कर असा सल्ला दिला. तिला मोबाईल देण्यास नकार दिला. याविषयी मयत मुलगी संजना झोरे हिला राग आला. तिने रागाच्या भरात घरातील एका खोलीत पंख्याच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. आईने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला. मुलगी आतून दरवाजा उघडत नव्हती. सोसायटीतील सदस्यांनी धावपळ करून खोलीत पाहिले तर संजनाने गळफास घेतला होता. मानपाडा पोलिसांना ही माहिती देण्यात आली.

# डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाटांवरील वर्दळीच्या ठिकाणची उपहारगृहे हटवली

■ डोंबिवली : सुचिता देशमुख

**डोंबिवली रेल्वे स्थानकातील प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेऊन या रेल्वे स्थानकातील फलाटांवरील प्रवासी गर्दीला अडथळा ठरणारी उपहारगृहे हटविण्यात आली आहेत. ही उपहारगृह रेल्वे स्थानका बाहेरील रेल्वेच्या हद्दीत तिकीट खिडकीजवळ, फलाटांच्या एका बाजुला स्वच्छतागृहांजवळ स्थलांतरित करण्यात आली आहेत. ही उपहारगृह हटविण्यात आल्याने प्रवाशांची कुचंबणा होऊ लागली आहे.**

मध्य रेल्वे स्थानकावरील डोंबिवली सर्वाधिक प्रवासी गर्दीचे स्थानक म्हणून ओळखले जाते. या फलाटावर मागील अनेक वर्षापासून रेल्वेच्या परवानगीने प्रवाशांच्या खानपान सेवेसाठी उपहारगृहे सुरू होती. ही उपहारगृहे जिन्यांच्या मार्गात यापूर्वी उभारण्यात आली होती. जुन्या काळात उभारण्यात आलेली ही उपहारगृहे फलाटावरील प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे आता अडथळा ठरू लागली होती. डोंबिवली रेल्वे स्थानकात स्कायवॉकचे आधारखांब, पुलाचे लोखंडी सांगाडे यांची




गुंतागुंत आहे. हे सगळे अडथळे अगोदरच असताना, डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाटांवरील उपहारगृहे सकाळ, संध्याकाळच्या वेळेत प्रवासी गर्दीला अडथळा ठरू लागली होती. डोंबिवली स्थानकातील प्रवाशांची वाढती गर्दी विचारात घेऊन प्रवाशांना रेल्वे स्थानकातील फलाटांवर सुटसुटीतपणे जाता यावे. उभे राहता यावे या विचारातून मध्य रेल्वेच्या वाणिज्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी गेल्या महिन्यात डोंबिवली रेल्वे स्थानकाची पाहणी केली. या पाहणीच्यावेळी या स्थानकातील उपहारगृहे ही प्रवाशांच्या येण्याच्या जाण्याच्या मार्गात आणि गर्दीच्या वेळेत अडथळा ठरत असल्याचे दिसून आले होते. अधिकाऱ्यांनी फलाटावरील उपहारगृहे रेल्वे स्थानकालगतच्या रेल्वेच्या जागेत रेल्वे तिकीट खिडक्यांजवळ व फलाटाच्या एका बाजुला स्वच्छतागृहांजवळ प्रवासी वर्दळ नसलेल्या भागात स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाप्रमाणे डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोन, तीन आणि पाच वरील उपहारगृहे अन्य भागात स्थलांतरित करण्याचा निर्णय रेल्वे अधिकाऱ्यांनी घेतला. उपहारगृह चालकांना त्यासंबंधी नोटिसा देऊन महिनाभराची मुदत देण्यात आली. उपहारगृह चालक मे. एस. एच. जोंधळे केटरिंग लायसन्स, मे. ए. एच. व्हिलर यांनी रेल्वे प्रशासनाकडे उपहारगृह हटविण्यासंबंधी मुदत वाढून देण्याची मागणी केली. रेल्वे प्रशासनाने ही मागणी फेटाळली.

विहित वेळेत उपहारगृह स्थलांतरित केली नाहीतर कारवाई करण्याचा इशारा दिला. त्यामुळे डोंबिवली रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक दोनवरील उपहारगृह फलाटावरील कल्याण बाजुला स्कायवॉकखाली, पाचवरील उपहारगृह रामनगर रेल्वे तिकीट खिडकीजवळ स्थलांतरित करण्यात आली आहेत. ही उपहारगृहे स्थलांतरित करण्यात आल्याने प्रवाशांची मात्र गैरसोय होऊ लागली आहे. नवीन जागेत स्थलांतरित करण्यात आलेली स्वच्छतागृहे एका बाजुला आणि प्रवासी वर्दळीपासून दूर असल्याने ग्राहक येत नाहीत.

# छताचे प्लास्टर कोसळून पाच वर्षीय मुलीचा मृत्यू

■ ठाणे : तृप्ती गोरे

मुंब्रा येथील जीवन बाग भागात रविवारी ३० वर्ष जुन्या इमारतीमधील एका सदनिकेच्या छताचे प्लास्टर कोसळून पाच वर्षीय मुलीचा मृत्यू झाला. उनेजा शेख



असे मृत मुलीचे नाव असून तिचे आई-वडील आणि भाऊ जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जीवन बाग येथे बानु टॉवर ही तळ अधिक पाच मजली ३० वर्ष जुनी इमारत आहे. या इमारतीत एकूण २० सदनिका आणि सहा दुकाने आहेत. इमारतीमधील तळ मजल्यावरील एका सदनिकेत उनेजा ही तिचे वडील उमर शेख (२३), आई मुस्कान (२१) आणि भाऊ इजान (एक वर्ष) यांच्यासोबत राहात होती. रविवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास त्यांच्या सदनिकेतील स्वयंपाक घरातील छताचे प्लास्टर अचानक कोसळले. यात उनेजा ही गंभीर जखमी झाली. तर तिचे आई, वडील आणि भाऊ किरकोळ जखमी झाले. घटनेची माहिती मिळाल्यानंतर ठाणे महापालिकेचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी आणि मुंब्रा पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. उनेजा हिला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. इमारत सी-२ बी (इमारत रिकामी न करता रचनात्मक दुरुस्ती करणे) या प्रवर्गात येते. इमारतीमधील रहिवाशांना दुरुस्तीच्या सूचना देण्यात आल्या होत्या असे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आले.

# बदलापुरातही नैसर्गिक नाल्यात बांधकाम; राष्ट्रीय हरित लवादाच्या भूमिकेनंतर बांधकामावर प्रश्नचिन्ह

■ बदलापूर: सचिन कदम

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील एका नाल्यावर स्लॅब टाकल्याचे प्रकरण राष्ट्रीय हरित लवादाच्या समोर आल्यानंतर लवादाने असे नाले खुलेच असायला हवेत, असे निरिक्षण आणखी एका प्रकरणात यापूर्वीच नोंदवल्याचे स्पष्ट केले होते. बदलापूर पश्चिमेतील उड्डाणपुलाखालून वाहणाऱ्या नाल्यात अशाच प्रकारे खुद्द कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या माध्यमातून स्लॅब टाकला जातो आहे. येथे भाजी मंडई उभारण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे. मात्र राष्ट्रीय हरित लवादाच्या निरिक्षणानंतर पालिकेचे हे बांधकामावरही वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. बदलापुरातील नैसर्गिक नाल्यांवर आधीच संक्रात आली असून त्यामुळे नाल्यांची रूंदी घटल्याचा पर्यावरणप्रेमींचा दावा आहे.

कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीत बदलापूर रेल्वे स्थानकापासून आणि शहरातील एकमेव उड्डाणपुलाच्या खालून शहरातील महत्वाचा नाला वाहतो. या नाल्याला शहरातील विविध नाले येऊन मिळतात. शहरातील हा सर्वात मोठा नाला पुढे उल्हास नदीला जाऊन मिळतो. या नाल्याची रूंदी गेल्या काही वर्षात कमी झाल्याचे समोर आले आहे. नाल्याच्या किनारी अनेक गृहप्रकल्प उभे राहिले. काही ठिकाणी नाल्यात भर घालून मालकीच्या जागांचा विकास झाला. शहराच्या पश्चिमेला साईकृपा हॉस्पीटलसमोरून वाहणाऱ्या या नाल्यात सध्या बांधकामासाठी उभारलेले सिमेंट कॉंक्रिटचे खांब उभे आहेत. लोकसभा निवडणुकीपूर्वी येथे नाल्यावर स्लॅब टाकून तो बंदिस्त करून त्यावर भाजी मंडई सुरू करण्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. लागलीच त्याच्या कामाला सुरूवात झाली. मात्र सध्या हे काम बंद आहे. बदलापूर पूर्वेतून टाहुली डोंगरातून आणि संपूर्ण शहरातून येणारे पावसाळी पाणी, सांडपाणी या नाल्यातून उल्हास नदीला मिळते. पावसाळ्यात नाला रौद्र रूप धारण




करतो. मात्र याच नाल्यात सिमेंट कॉंक्रिटचे खांब टाकून नाला बंदीस्त केल्यास भविष्यात विविध प्रश्न उपस्थित होऊ शकतात. अशाच एका नाल्यावरील बांधकामाच्या प्रकरणात राष्ट्रीय हरित लवादाने काही निरिक्षणे नोंदवली आहेत. नवी मुंबई महापालिकेतील ऐरोली येथे सेक्टर – १४ मध्ये एका खुल्या नाल्यावर स्लॅब टाकून बांधकाम करण्यास सुरुवात झाल्याची बाब निदर्शनास आणत हे बांधकाम जल कायदा आणि किनारा नियमन क्षेत्राच्या नियमात बसत नसल्याची तक्रार एका याचिकाकर्त्याने राष्ट्रीय हरित लवादाकडे केली होती. या याचिकेवरील सुनावणीत अशी बांधकामे पर्यावरणीयदृष्ट्या धोकादायक असल्याची निरिक्षणे लवादाने नोंदवली आहेत. अशाच एका प्रकरणात संबंधित प्रशासनाला नाला बंदिस्त करण्यासाठी करण्यात आलेले बांधकाम पाडण्याचे आदेश दिले असल्याचे राष्ट्रीय हरित लवादाने सुनावणी पत्रात स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकारानंतर बदलापुरातील नाल्यातील बांधकामही वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता व्यक्त होते आहे. खुला नाला बंदिस्त करणे कायद्याने गुन्हा असून स्लॅब टाकणे म्हणजे नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण करणे आहे. तसेच पावसाळ्यात वेगाने वाहणारे पाणी माती, झाड्यांच्या फांद्या तसेच मानवी कचरा वाहून नेते.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# नौदल अधिकाऱ्याची २२ लाखांची सायबर फसवणूक, सांताक्रुझ येथील आरोपीला अटक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

शेअर ट्रेडिंगच्या नावाखाली नौदल अधिकाऱ्याची २२ लाख रुपयांची सायबर फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला असून गेल्या काही महिन्यांमध्ये अशा प्रकारे फसवणूक करण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या प्रकरणी दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून बँक खात्यातील व्यवहाराच्या मदतीने पोलिसांनी सांताक्रुझ येथील रहिवासी असलेल्या आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडून पाच लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

तक्रारदार नौदलाचो अधिकारी असून करंजा येथे कार्यरत आहेत. त्यांनी समाज माध्यमांवर एक जाहिरात पाहिली होती. त्या जाहिरातीवरील लिंकवर त्यांनी क्लिक केले. त्यानंतर त्यांना एका कंपनीच्या नावाने असलेल्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सामावून घेतले गेले. त्या ग्रुपवर शेअर ट्रेडिंगची माहिती पुरवली जात होती. मे महिन्यात अविनाश शर्मा, करण मोदी व अक्षता या नावाने आरोपींनी त्यांच्याशी संपर्क साधला. तक्रारदार यांना संदेश पाठवून ट्रेडिंग साठी एक अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. अॅप डाऊनलोड झाल्यावर माहिती देण्यात (केवायसी) आली. एक महिला ही त्यांना पैसे जमा करण्यास सांगत होती. त्यानुसार तक्रारदार हे ठरविक



रक्कम त्या खात्यात पाठवत होते. रक्कम पाठवल्यानंतर त्याना खरेदी केलेल्या शेअर्सवर फायदा झालेला दिसत होता. या घटनेनंतर महिलेने तक्रारदार यांना त्या ग्रुपमधून बाहेर पडण्यास सांगून दुसऱ्या ग्रुपमध्ये सामील केले. महिलेने दिलेल्या सूचनेनुसार तक्रारदाराने एकूण २२ लाख ९१ हजार रुपये अॅपमध्ये जमा केले. पैसे गुंतवल्यानंतर त्याने जमा झालेला नफा काढण्यासाठी महिलेला विनंती केली. तिने अॅपवर जाऊन नफा कसा काढायचा हे सांगितले. दोन वेळा त्यांनी जमा झालेला नफा काढला होता. अॅपवर त्यांना चांगला नफा झाल्याचे दिसले. कंपनीचे शुल्क घेऊन बाकीचे पैसे खात्यात वर्ग करण्यास तक्रारदार याने सांगितले. तेव्हा त्यांना आणखी रक्कम भरण्यास सांगण्यात आले. त्यावेळी आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानुसार त्यांनी पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर दक्षिण प्रादेशिक सायबर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

तपासणीत शोएब एलेक्स अॅन्थोनी नावाच्या व्यक्तीच्या बँक खात्यात पाच लाख रुपये जमा झाल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. याबाबत तपासणी केली असता ते बँक खाते ममन मुन्सी नावाची व्यक्ती वापरत असल्याचे निष्पन्न झाले. अखेर त्याला याप्रकरणी सांताक्रुझ येथून अटक करण्यात आली.

## ऑनलाईन जुगारात कर्जबाजारी, गुजरातमधील तरुणाची विरारमध्ये आत्महत्या

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

ऑनलाईन जुगारात कर्जबाजारी झाल्याने गुजरातच्या वापी जिल्ह्यात राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणाने विरारच्या वैतरणा खाडीत उडी मारू आत्महत्या केली. अर्नाळा समुद्रकिनाऱ्यावर त्याचा मृतदेह आढळला. सपन पटेल (२७) हा तरुण गुजराथ जिल्ह्याच्या वापी येथे राहतो. २ सप्टेंबरला तो आपल्या दुचाकीने मुंबईत जाण्यासाठी निघाला होता. मुंबईत नोकरीसाठी मुलाखत देण्यासाठी जात असल्याचे त्याने सांगितले होते. मात्र तो घरी परतला नसल्याने त्याचा शोध सुरू होता. दरम्यान त्याच्या घरात त्याने लिहिलेली एक चिठ्ठी त्याच्या कुटुंबियांना आढळली. त्यात ऑनलाईन जुगारामुळे १५ लाखांचे कर्ज झाल्याने मी आत्महत्या करत असल्याचे लिहिले होते. ती चिठ्ठी वाचून कुटुंबियांना धक्का बसला आणि त्यांनी वापी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वापी पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान, १२ सप्टेंबर रोजी विरारच्या अर्नाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील समुद्रात पोलिसांना एका तरुणाचा मृतदेह आढळला होता. हा मृतदेह सपन पटेलचा होता.



## डोंबिवलीत तरुणाच्या अंगावर मोटार घालून फरफटत नेऊन ठार मारण्याचा प्रयत्न

■ **डोंबिवली: विशेष प्रतिनिधी**

आमाच्या खासगी मालकीच्या जागेवर का उभा राहिला, असा प्रश्न करून डोंबिवलीजवळील दावडी गावातील मिलिंद नाथा ठाकरे (३५) या इसमाने एका औषध विक्री व्यवसायातील तरुणाला बेदम मारहाण, शिवीगाळ केली. या तरुणाच्या अंगावर मोटार कार घालून त्याला काही मीटर अंतरावर फरफटत नेऊन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. शनिवारी रात्री दावडी गावातील शिवमंदिर जानूनगर भागात ही घटना घडली. संजय हरिश्चंद्र यादव (२७) असे औषध विक्री व्यवसायातील तरुणाचे नाव आहे. तो दावडी गावात राहतो. मिलिंद ठाकरे असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, संजयला सर्दी झाल्याने तो शनिवारी रात्री सर्दीची गोळी खरेदीसाठी मित्र शरद यादवसह औषध दुकानात चालला होता. तो गप्पा मारत



काही वेळ एके ठिकाणी थांबला. तेथे आरोपी मिलिंद ठाकरे आले. त्यांनी ही माझी खासगी जमीन आहे. येथे तुम्ही थांबू नका, असे सांगून त्यांना जाण्यास सांगितले. मिलिंद यांच्या बोलण्यानंतर तक्रारदार संजय आणि त्याचा मित्र सार्वजनिक रस्त्यावर येऊन गप्पा मारू लागले. यावेळी आरोपी मिलिंद स्वत:ची वॅ गनॉर मोटार घेऊन समोरून वेगाने आला. त्याने संजय आणि त्याच्या मित्राला बेदम मारहाण केली. संजयला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. हा सगळा प्रकार पाहून संजय व त्याचा मित्र चक्रावले. आम्ही आपणास काही केले नाही तरी तुम्ही का आम्हाला मारता, असे प्रश्न यादव बंधू करत होते. त्याचा राग मिलिंदला आला. त्यांनी स्वत:च्या ताब्यातील मोटार जोराने संजय यादव याच्या अंगावर घातली. आपल्या जीवाला धोका आहे म्हणून संजय रस्त्याने पळू लागले.

# वॉशिंग सेंटरवर दरोडा टाकणं भोवलं: पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या

■ **पुणे : अभिजीत येरुल्लू**

लाकडी दांडके तसेच शस्त्राच्या आधारे ऑटोमोबाईल आणि वाशिंग सेंटर लुटणाऱ्या टोळक्याला चतु:श्रृगी पोलिसांनी सापळा रचून अटक केली. धक्कादायक म्हणजे, त्यात ५ अल्पवयीन मुलांचा समावेश असून, त्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई बालेवाडी परिसरात केली आहे. अलीम सय्यद (वय १९), देवा शिरोळे (वय २०), मोहन अडागळे (वय १९) यांच्यासह अन्य ५ अल्पवयीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी सिंद्धेश्वर दिगंबर ढेरे (वय ३४, रा. पाटील वस्ती, बालेवाडी) यांनी तक्रार दाखल केली आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी,



पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे, विजयानंद पाटील, उपनिरीक्षक प्रविल चौगुले, पोलीस अंमलदार श्रीकांत वाघेले, दांगडे आदीच्या पथकाने केली. तक्रादार ढेरे यांचे प्रथमेश पार्क सोसायटी बालेवाडीसमोर रविराज ऑटोमोबाईल ॲन्ड वाशिंग सेंटर आहे. शुक्रवारी (दि. २०) सायंकाळी साडे पाचच्या सुमार अली सय्यद आणि त्याच्या साथिदारांनी लाकडी दांडके आणि धारधार हत्याराचा धाक दाखवून तक्रारदार आणि त्यांच्या ४ मित्राकडून ४९ हजार रोख रक्कम आणि २० हजार किंमतीचा एक मोबाईला घेउन गेले होते. याबाबत तक्रारदार यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला फोन करुन घटनेची माहिती दिली होती.चतुश्रृगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक महेश बाळकोटगी यांनी घटनेची गंभीर दखल घेत आरोपींचा शोध घेण्याबाबत तपास पथकांना सूचना केल्या आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पिंपळे गुरव येथे सापळा रचून आरोपींना ताब्यात घेतले.

## नायगाव पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी; आत्महत्येच्या प्रयत्नात असलेल्या तीन महिलांचे वाचवले प्राण

■ **वसई : सुचिता सोनावणे**

वेगवेगळ्या घटनेत आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या तीन महिलांना नायगाव पोलिसांनी तत्परतेने मदत करून वाचविण्यात यश मिळवले. मागील पंधरा दिवसात या घटना घडल्या. ११२ या नियंत्रण कक्षाला आलेल्या दूरध्वनीवरून माहिती मिळाताच पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी दोघींचे प्राण वाचवले. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळाराम पालकर यांनी गळफास घेतलेल्या महिलेला वैद्यकीय उपचार देऊन तिचे प्राण वाचवले. बुधवार १८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ च्या सुमरास नायगावच्या परेरानगर येथील रेड रोज इमारतीमध्ये राहणारी १६ वर्षीय तरुणी घरातील पंख्याच्या सिलिंगला दुपट्टा बांधून वॉशिंग मशीनवर चढून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत होती. पोलिसांच्या ११२ हेल्पलाईन क्रमांकावर ही माहिती मिळाली. पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. या मुलीने घराच्या दरवाजाला आतून कडी लावली होती. मात्र घुगे यांनी प्रसंगावधान दाखवून घराचा दरवाजा तोडून प्रवेश केला. ही मुलगी वॉशिंग मशीनवर चढून आत्महत्येच्या प्रयत्नात होती. पोलिसांनी तिला थांबवून तिचे समुपदेशन करून तिला आत्महत्येपासून प्रवृत्त करून तिचे प्राण वाचवले. सदर मुलीला तिच्या आईने घरगुती कारणावरून ओरडल्यामुळे तिने सदरचे पाऊल उचलले होते. अशीच एक घटना रविवार १ सप्टेंबर रोजी घडली होती. नक्षत्र प्राइड इमारत येथे राहणाऱ्या एका दाम्पत्यामध्ये जोराचे भांडण सुरू असून तुम्ही तात्काळ मदत करा, असा कॉल सदर भांडणातील महिलेच्या भावाने उत्तर प्रदेश येथून



११२ या हेल्पलाईन क्रमांकावर केला. कर्तव्यावरील पोलीस शिपाई संतोष घुगे यांनी घटनास्थळी धाव घेतली. या बिल्डिंगच्या खाली लोक जमा झालेले व घरातून भांडणाचा आवाज येत होता. घुगे यांनी आत घरात प्रवेश केला असता ३७ वर्षीय महिला गॅलरीकडे पळत जाऊन १३ व्या मजल्यावरून उडी मारण्याचा प्रयत्न करत होती. मात्र घुगे यांनी चातुर्याने प्रसंगावधान दाखवून सदर महिलेचे केस पकडून तिला उडी मारताना पकडले आणि तिला वाचवले. शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी जूचंद्र येथील म्हात्रेवाडी चाळीत रात्री २४ वर्षीय विवाहित महिलेने कौटुंबिक वादातून गळफास लावल्याची माहिती रात्रगस्त अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळाराम पालकर यांना मिळाली होती. पालकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मात्र त्या महिलेची प्रकृती गंभीर होती. तिचे शरीर थंड पडले होते. ती बोलण्याच्या स्थितीत नव्हती. पालकर यांनी तात्काळ सदर महिलेला खाजगी वाहनांमध्ये रुग्णालयात दाखल केले. तीन दिवस उपचारानंतर महिलेचे प्राण वाचले. पालकर यांनी वेळीच वैद्यकीय उपचार दिले नसते तर महिलेचे प्राण वाचले नसते.

## हिरे व्यापाऱ्याच्या गाडीच्या धडकेत कामगाराचा मृत्यू, सागरी किनारा रस्त्यावरील घटना

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

सागरी किनारा रस्त्यावर भरधाव वेगात धावणाऱ्या हिरे व्यापाऱ्याच्या बीएमडब्ल्यू गाडीने दिलेल्या धडकेत कामगाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी वरळी पोलिसांनी हिरे व्यापारी राहिल हिंमाशु मेहता (४५) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या अपघातात कामगार काश्मिर मिसा सिंहचा मृत्यू झाला आहे. सिंगचा सहकारी पिंटुकुमार जातन ठाकुर (३६) याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला. ठाकूर याने पोलिसांना दिलेल्या तक्रारीनुसार, गेल्या पाच वर्षांपासून सागरी किनारा रस्ता प्रकल्पस्थळी वेल्डींगचे काम करण्यात येत आहे. सागरी किनारा



रस्ता प्रकल्पाचे काम करणाऱ्या एचसीसी कंपनीने कर्मचाऱ्यांसाठी जिजामाता नगर येथे निवासाची व्यवस्था केली आहे. त्यांच्यासोबतच वायरमन काश्मिर मिसा सिंगही राहात होता. नेहमीप्रमाणे १६ सप्टेंबर रोजी सगळे कामावर हजर झाले. १७ सप्टेंबर रोजी पूजा असल्याने सागरी किनारा रस्ता प्रवेशद्वार क्रमांक २ वरळी दूध डेरीसमोर मंडप बांधण्याचे काम सुरू होते. तेथे उभा असताना अचानक जोरात आवाज झाला. घटनास्थळी धाव घेतली असता सागरी किनारा रस्त्याच्या दक्षिण वाहिनीच्या दिशेने भरधाव वेगात आलेल्या बीएमडब्ल्यू गाडीने सिंहला धडक दिल्याचे दृष्टीस पडले, असे पोलिसांना सांगितले.

# गुन्हे शाखा-२ च्या पथकाची जलद कामगिरी, महामार्गावर आढळलेल्या मृतदेहाच्या हत्ये प्रकरणात तृतीयपंथीय ताब्यात

■ **वसई : विशेष प्रतिनिधी**

मुंबई अमहदाबाद महामार्गाव जवळील सापडलेल्या एका अनोळखी मृतदेहाची ओळख पटविण्यापूर्वीच गुन्हे शाखा २ च्या पथकाने मारेकऱ्यास ताब्यात घेतले आहे. एका तृतीयपंथियाने ही हत्या केल्याच संशय आहे. मुंबई अमहदाबाद महामार्गाजवळ असलेल्या सातिवली गावाजवळ एक खिंड आहे. गुरूवारी दुपारी २ च्या सुमारास येथील झुडपात एक अर्धनग्न अवस्थेत एका इसमाचा मृतदेह आढळला होता. दगडाने ठेचून त्याची हत्या करण्यात आली होती. त्याचे वय ३० वर्षाच्या आसपास होते. त्याची ओळख पटेल अशी एकही वस्तू घटनास्थळी नव्हती. मयताची ओळख पटविण्याचे त्याचबरोबर मारेकऱ्याला शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांपुढे होते. मात्र मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा- २ च्या पथकाने अवघ्या २४ तासांच्या आत रुपा शेख नावाच्या तृतीयपंथीयाला या हत्या प्रकरणात संशयावरून ताब्यात घेतले




आहे. घटनास्थळावर सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. गुन्हे शाखा २ च्या पथकाचे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे यांच्या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असता एक साडी तसेच वापरलेले काही कॉण्डम आढळले. त्यावरून पोलिसांच्या पथकाने या हत्येमागे तृतीयपंथी असल्याचा तर्क लावला. रात्रीच्या वेळी तृतीयपंथीय या परिसरात असतात आणि मयत तृतियपंथीयाकडे आलेला ग्राहक असू शकतो असा कयास पोलिसांनी लावला. रात्रीपासून पोलिसांनी शहरातील सर्व तृतियपंथीयांच्या वस्त्या, अड्डे यावर धाडी घातल्या.

## पुणे साखळी बॉम्बस्फोट प्रकरण: १२ वर्षे उलटूनही खटला प्रलंबितच, आरोपी मुनीब मेमनला जामीन

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

पुणे येथे २०१२ साली झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी मुनीब इक्बाल मेमन याला शुक्रवारी उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला. गेल्या १२ वर्षांपासून तो तुरुंगवासात असून त्याच्यावरील खटला अद्यापही प्रलंबित



आहे. त्यामुळे, त्याच्यासाठी ही एकप्रकारची खटलापूर्व नजरकैद असल्याचे नमूद करून न्यायालयाने त्याला १२ वर्षांनंतर जामीन मंजूर केला. एक दशकाहून अधिक काळ खटलापूर्व तुरुंगवास हा घटनेच्या अनुच्छेद २१ चे म्हणजेच जगण्याचा स्वातंत्र्याचे आणि खटला जलद चालवण्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन आहे. मुनीबवरील खटला २०१३ मध्ये सुरू झाला. तो डिसेंबर २०२३ पर्यंत तरी निकाली निघायला हवा होता. मात्र, खटल्यात वर्षाला चारच साक्षीदार तपासले गेले, असा दावा मुनीब याच्या वतीने वकील मुबीन सोलकर यांनी केला होता. त्यांचा हा दावा न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे आणि न्यायमूर्ती शर्मिला देशमुख यांच्या खंडपीठाने योग्य ठरवला. तसेच, मुनीबला जामीन मंजूर केला. मुनीब याने याआधीही उच्च न्यायालयात धाव घेऊन जामिनाची मागणी केली होती. परंतु, विशेष न्यायालयाला डिसेंबर २०२३ पर्यंत खटला पूर्ण करण्याचे आदेश देऊन न्यायालयाने याचिका फेटाळली होती. परंतु, खटला निर्धारित वेळेत निकाली निघाला नाही, त्याविरोधात मुनीब याने आधी विशेष न्यायालयात जामिनाची मागणी केली होती. ती फेटाळली गेल्यानंतर त्याने पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेऊन जामिनाची मागणी केली होती.

# उद्वाहनात अल्पवयीन मुलीचा विनयभंग, इमारतीच्या सुरक्षा रक्षकाला अटक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

उद्वाहनात अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या सुरक्षा रक्षकाला चारकोप पोलिसांनी गुरुवारी अटक केली. आरोपीविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी चारकोप पोलीस अधिक तपास करीत आहेत.



१२ वर्षांच्या पीडित मुलीला वडिलांनी जेवणासाठी तेल आणण्यासाठी पाठवले होते. पीडित मुलगी गुरुवारी दुकानातून तेल घेऊन आली. त्यावेळी उद्वाहनातून घरी जात असताना आरोपी सुरक्षा रक्षक मुलीशी बोलण्याच्या बहाण्याने उद्वाहनात शिरला. त्यानंतर त्याने तिचा विनयभंग केला. या घटनेमुळे पीडित मुलगी घाबरली. तिने हा प्रकार आईला सांगितला. आईने याप्रकरणी चारकोप पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७४ व पोक्सो कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला. आरोपी इमारतीचा सुरक्षा रक्षक घटनेनंतर विरारला पळून गेला होता. त्याच्या शोध घेण्यासाठी एक पथक विरारला पाठवण्यात आले. त्यांनी आरोपीला पकडून चारकोप पोलीस ठाण्यात आणले. तेथे त्याला याप्रकरणी अटक करण्यात आली.

## विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्या शाळेच्या बसमधील सहाय्यकाला अटक

■ **मुंबई : विशेष प्रतिनिधी**

कांदिवली पूर्व येथे विद्यार्थिनीचा विनयभंग करणाऱ्या शाळेच्या बसमधील ६१ वर्षीय सहाय्यकाला समता नगर पोलिसांनी गुरुवारी अटक केली. आरोपीने पीडित मुलीचा शाळेच्या बसमध्ये विनयभंग केल्याची तक्रार मुलीच्या आईने पोलिसांकडे केली होती. त्यानुसार समता नगर पोलिसांनी याप्रकरणी विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल केला. पीडित मुलगी सोमवार, १६ सप्टेंबर रोजी



शाळेच्या बसमधून जात असताना आरोपीने तिचा विनयभंग केला. या प्रकारामुळे घाबरलेल्या पीडित मुलीने हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. अखेर पीडित मुलीने आईला हा प्रकार सांगितला. त्यानंतर पीडित मुलीची आई आरोपीला घेऊन पोलीस ठाण्यात आली. त्यांच्या तक्रारीवरून गुरुवारी समता नगर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ७४ व पोक्सो कायदा कलम १० व १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपीला याप्रकरणी अटक करण्यात आली. आरोपी कांदिवली पूर्व येथील रहिवासी असून त्याला याप्रकरणी अटक करण्यात आल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

## तिकीट निरीक्षकाला प्रवाशाकडून हॉकीस्टिकने मारहाण, नालासोपारा स्थानकातील घटना

■ **वसई: विशेष प्रतिनिधी**

नालासोपारा स्थानकात तिकीट निरीक्षकाला प्रवाशाकडून हॉकी स्टिकने मारहाण केल्याची घटना घडली आहे. विजयकुमार पंडित असे तिकीट निरीक्षकाचे नाव असून या मारहाणीत गंभीर जखमी झाला आहे

गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास विजयकुमार पंडित नालासोपारा रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या तिकीट तपासणीचे काम करीत होते. याच दरम्यान पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकल मध्ये एक प्रवासी द्वितीय श्रेणीचे तिकीट घेऊन प्रथम श्रेणीच्या डब्ब्यातून प्रवास करताना आढळून आला.

त्या प्रवाशाला तिकीट अडविल्या नंतर त्याला ३४५ रुपये इतका दंड ठोठावला होता. त्याच्याकडे फक्त २१० रुपये असल्याचा दावा प्रवाशाने केला होता. त्यामुळे त्याला १५० रुपये इतका दंड आकारला होता. मात्र दंडाची पावती फाडल्यानंतर त्यांच्या बाचाबाची होऊन प्रवाशाने मागून हॉकीस्टिकने तिकीट निरीक्षकाला मारहाण केली. यात एक प्रहार त्यांच्या




कानाजवळ झाल्याने पंडित हे जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात ओले. तर मारहाणीनंतर हल्लेखोर प्रवासी फरार झाला आहे.

याप्रकरणी वसई रेल्वे पोलीस ठाण्यात मारहाण करणाऱ्या प्रवाशाच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्याचा शोध सुरू असल्याची माहिती वसई रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भगवान डांगे यांनी सांगितले आहे.

# मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ, विधानसभा निवडणुकीसाठी मुंबईत १0 हजार १११ मतदान केंद्रे, प्रत्येक केंद्रावर सरासरी १२00 मतदार

■ मुंबई : राकेश गायकवाड

लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी मतदान केंद्राबाहेर लागलेल्या रांगांचा अनुभव लक्षात घेऊन येत्या विधानसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्रांच्या संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक मतदान केंद्राच्या (बूथ) ठिकाणी पूर्वी असलेली सरासरी १५०० मतदारांची संख्या आता सरासरी १००० ते १२०० इतकी करण्यात आली आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदान केंद्रांच्या संख्येत २१८ ने वाढ झाली असून मतदान केंद्रांची संख्या आता १० हजार १११ वर पोहोचली आहे.

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार, मतदारांना सुलभतेने मतदान करता यावे, या दृष्टीकोनातून मुंबईतील मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. या सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे बृहन्मुंबई क्षेत्रातील मतदान केंद्रांची संख्या आता १० हजार १११ इतकी झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत मतदान केंद्रांच्या संख्येत २१८ ने वाढ झाली आहे. परिणामी, मतदानाचे प्रमाण आणि वेग वाढण्यास मदत होणार आहे.

भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशांनुसार, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली



येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रशासन तयारी करीत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करण्यात आले आहे. सुसूत्रीकरण करताना प्रामुख्याने एका मतदान केंद्रावर सरासरी १२०० पर्यंत मतदारसंख्या राहील, हे सूत्र लक्षात ठेवून मतदान केंद्रांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. तर, अधिक मतदान केंद्र असणाऱ्या एकाच ठिकाणावरील मतदान केंद्रांचे विक्रेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तुलनेत मतदान केंद्रांची संख्या वाढली आहे.

मतदान केंद्रांबाबत माहिती देण्यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत मुंबई महानगरपालिका मुख्यालयात नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, संबंधित अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. लोकसभा निवडणुकीच्या वेळी मुंबई शहर जिल्ह्यामध्ये एकूण २ हजार ५०९ मतदान केंद्रे होती. तर, मुंबई उपनगर जिल्ह्यात ही संख्या ७ हजार ३८४ इतकी होती. सुसूत्रीकरण कार्यक्रमामुळे मतदान केंद्रांची संख्या अनुक्रमे २ हजार ५३७ आणि ७ हजार ५७४ म्हणजेच संपूर्ण बृहन्मुंबई क्षेत्रात (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हे) १० हजार १११ इतकी झाली आहे.

# दसरा मेळावासाठी केवळ ठाकरे गटाकडून अर्ज, अद्याप परवानगी नाही

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

दसरा अवघ्या काही दिवसांवर आला असून यंदा दादरच्या शिवाजी पार्कवर शिवसेनेच्या दोन गटांपैकी कोणाला सभा घेण्यास परवानगी मिळणार याबाबतची उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र यावेळी अद्याप शिवसेनेच्या ठाकरे गटानेच पालिका प्रशासनाकडे अर्ज सादर केला आहे. ठाकरे गटाने तीन महिन्यांपूर्वीच सादर केलेल्या या अर्जावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज उद्यान अर्थात शिवाजी पार्क येथे दरवर्षी शिवसेनेचा दसरा मेळावा होतो. दसरा मेळावा शिवसेनेसाठी प्रतिष्ठेचा मानला जातो. येत्या १२ ऑक्टोबर रोजी दसरा असून आता जेमतेम २० दिवस शिल्लक आहेत. शिवसेनेची दोन शकले झाल्यापासून दसरा मेळाव्यावरून



शिवसेनेच्या दोन गटात प्रतिष्ठेची लढाई झाली होती. मात्र दोन्ही वेळेला उद्धव ठाकरे यांच्या गटालाच परवानगी मिळाली होती. यंदाही ठाकरे यांच्या शिवसेनेचे विभागप्रमुख महेश सावंत यांनी परवानगीसाठी अर्ज दिला आहे. तीन महिन्यांपूर्वीच त्यांनी अर्ज दिला असून अद्याप त्यावर पालिकेने कोणताही निर्णय घेतलेला नाही, अशी माहिती सावंत यांनी दिली. या प्रकरणी पालिकेला तीन वेळा स्मरणपत्रही पाठवल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, अद्यापपर्यंत केवळ ठाकरे गटाचाच अर्ज आला असल्याची माहिती पालिकेतील सूत्रांनी दिली. मात्र तरीही निर्णय न झाल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

शिवसेनेची शकले पडल्यानंतर २०२२ च्या दसरा मेळाव्यापूर्वी मैदानाच्या परवानगीवरून दोन गटांत आरोप – प्रत्यारोपांच्या फैरी झडत होत्या. दोन गटांतील वाद न्यायालयात पोहोचला होता. ठाकरे गटाने न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयीन लढाईनंतर ठाकरे गटाला परवानगी देण्यात आली होती. त्या मेळाव्याला राज्यातील शिवसैनिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला होता व ठाकरे यांना सहानुभूतीही मिळाली होती. गेल्यावर्षी २०२३ च्या दसरा मेळाव्यालाही शिवसेनेच्या दोन्ही गटांनी अर्ज दिले होते. तेव्हाही ठाकरे गटाने पालिका प्रशासनाला स्मरणपत्र दिले होते, तसेच विभाग कार्यालयावर मोर्चाही काढला होता. वाद शिगेला पोहोचलेला असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर यांनी शिवाजी पार्क मैदानासाठी केलेला अर्ज मागे घेतल्याचे जाहीर केले.

# 'वाढवण'साठी सर्वात मोठे पॅकेज: प्रकल्पग्रस्त मच्छीमारांना उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे आश्वासन

■ नवी मुंबई : धनश्री सट्टा

प्रस्तावित वाढवण बंदराच्या प्रकल्पग्रस्त मच्छीमारांसाठी देशातले सर्वात मोठे आर्थिक पुनर्वसन पॅकेज देणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी केली. तसेच कोणालाही विस्थापित होऊ देणार नाही. याउलट मासेमारीसाठी अधिक चांगली व्यवस्था उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासनही त्यांनी दिले. ऐरोलीमध्ये 'कोळी भवना'च्या भूमिपूजन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेदेखील उपस्थित होते. वाढवण बंदर परिसरातील मच्छीमारांना अधिक चांगले मासेमारी बंदर, ट्रॉलर्स, चांगली व्यवस्था मिळणार आहेत. आमचे सरकार मच्छीमारांच्या बाजूने उभे राहणारे सरकार आहे.



नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान झाले, त्यांनी पहिल्यांदा कोळी समाजाचा विचार केला. म्हणूनच, स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांच्या इतिहासात केंद्र सरकारने मच्छीमारांकरिता एक वेगळे मंत्रिमंडळ तयार केल्याचे फडणवीस म्हणाले. आता देशात मोठ्याप्रमाणात जेट्टी, मासेमारी बंदरे तयार केली जात आहेत. महाराष्ट्रातही दोन मासेमारी बंदरे तयार करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. कोळी समाजाला न्याय देण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध आहे. नवी मुंबईचा विकास करताना शहराच्या गरजा लक्षात घेऊन पुढील काळात काम करणार असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

प्रकल्पग्रस्त, भूमिपुत्रांना न्याय देण्यासाठी सरकार कधीही हात अखडता घेणार नाही. लोकहिताच्या निर्णयात तडजोड केली जाणार नाही. गेल्या अनेक वर्षांपासून नवी मुंबईत गरजेपोटी बांधलेल्या घरांचा प्रश्न प्रलंबित आहे. जी घरे अनधिकृत ठरविली गेली होती. ती घरे आता पूर्णपणे नियमित करण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. आपण त्या फाइलवर स्वाक्षरी केली असून लवकरच शासन निर्णय काढला जाईल.

# उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी सरकारचे प्रोत्साहन; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

■ ठाणे : तृप्ती गोरे

मुंबई महानगर प्रदेशात उद्योग वाढीसाठी प्रचंड क्षमता असल्याने हा प्रदेश आर्थिक तंत्रज्ञानामध्ये देशाची राजधानी होऊ शकते आणि त्यासाठी आवश्यक असलेले निर्णय राज्य सरकार घेईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. नवी मुंबई विमानतळावर महिन्याभरात प्रायोगिक तत्त्वावर विमाने उड्डाण करतील आणि वाढवण विमानतळाचेही काम सुरू होईल, असे त्यांनी नमूद केले. ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात शनिवारी मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत ठाणे विकास परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री शिंदे यांनी मुंबई महानगर क्षेत्रात राबविण्यात येत असलेले प्रकल्प आणि भविष्यातील विकास आराखड्याबाबत माहिती दिली. विविध उपकरणांमध्ये चीपचा वापर केला जातो. या चीप निर्मितीचा देशातील पहिला उद्योग मुंबई महानगर क्षेत्रात सुरू होत आहे. याशिवाय, इतर क्षेत्रातील उद्योगही राज्यात येत आहेत. याचा अर्थ राज्यात उद्योग वाढीसाठी प्रचंड क्षमता असून या उद्योग वाढीसाठी काही निर्णय घेतले आहेत, असे शिंदे यांनी सांगितले. मुंबई महानगराचा आर्थिक विकास दर ७.३० टक्के इतका असून तो २०४७ पर्यंत २० टक्क्यांवर घेऊन जायचा आहे. त्यासाठी मित्रा संस्थेने महिन्यातून एक बैठक घेऊन त्यात सर्व विभागांच्या कामाचा आढावा घ्यावा. त्यात ज्या अडचणी समोर येतील, त्या सोडविण्यासाठी निर्णय घेऊ, असेही ते म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांचे ४० हजार नागरिकांना घर देण्याचे स्वप्न होते. त्यासाठी योजना आणल्या पण, प्रत्यक्षात घरे मिळू शकली नाहीत. त्यामुळे



योजनेतील त्रुटी दूर करून सर्व नागरिकांना घरे कशी मिळतील, यावर लक्ष केंद्रित केले आहे, असे ते म्हणाले.

**सेवा उद्योग व रोजगार निर्मितीसाठी चालना**

मुंबई महानगर क्षेत्र आंतरराष्ट्रीय आर्थिक विकास केंद्र म्हणून विकसित करण्यात येत आहे. यासाठी ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि मित्रा संस्थेने संयुक्तपणे ठाणे विकास परिषद आयोजित केली होती. यात सर्वांसाठी घरे, माहिती तंत्रज्ञान व आधारित सेवा उद्योग, पर्यावरणीय स्थिरता आणि रोजगार निर्मिती असे पाच गट तयार करण्यात आले होते. या क्षेत्राशी संबंधित प्रतिनिधींशी चर्चा करून सविस्तर अहवाल तयार करून तो मुख्यमंत्री शिंदे यांना पाठविण्यात आला.

# घाण वास येतोय, घरमालकाचा फोन, फ्रिजमध्ये लेकीचे तुकडे असल्याचं समजलं, आईची वेदनादायी माहिती'

■ बंगळुरु : विशेष प्रतिनिधी

एका २९ वर्षीय तरुणीचा मृतदेह तिच्याच घरातील फ्रिजमध्ये तुकड्यांमध्ये आढळून आल्याने एकच खळबळ माजली आहे. दिल्लीच्या श्रद्धा वालकर हत्याप्रकरणाची पुनरावृत्ती बंगळुरुत झाली. या घटनेने साऱ्यांना हादरवून सोडलं आहे. या तरुणीची हत्या करुन तिच्या मृतदेहाचे ३० तुकडे करण्यात आले, त्यानंतर ते फ्रिडमध्ये ठेवण्यात आले. जेव्हा ही घटना उघडकीस आली तेव्हा या तरुणीच्या कुटुंबीयांच्या पायाखालची जमीनच सरकली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महालक्ष्मी नावाच्या या महिलेच्या मृतदेहाचे ३० पेक्षा जास्त तुकडे करून ते फ्रिजमध्ये ठेवण्यात आले होते. हत्या झालेल्या तरुणीच्या आईने





सांगितलं की, त्यांना त्यांच्या मुलीच्या घरमालकाने फोन करुन घरातून दुर्गंधी येत असल्याची माहिती दिली. तेव्हा त्यांना या घटनेची माहिती मिळाली. 'घरातून दुर्गंधी येत असल्याची माहिती देण्यासाठी महालक्ष्मीच्या घरमालकाने आम्हाला रात्री फोन केला होता. माझ्या मुलीच्या मृतदेहाचे तुकडे करुन फ्रिजमध्ये भरले होते,' असं महालक्ष्मीच्या आईने सांगितले. महालक्ष्मी बेंगळुरूच्या व्यालीकवल भागात वन बेडरूमच्या अपार्टमेंटमध्ये राहत होती. ती विवाहित होती पण पतीपासून वेगळी राहत होती. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर तिचा नवराही घटनास्थळी आला, असे वृत्त पीटीआयने दिले आहे. महालक्ष्मीची हत्या दोन-तीन दिवसांपूर्वी झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला असून सध्या पोलिसांनी अहवालाची प्रतीक्षा आहे. ही घटना १८ मे २०२२ ला दिल्लीतील मेहरौली येथे श्रद्धा वालकरची तिच्या लिव्ह-इन पार्टनर आफताब पूनावाला याने निर्घृण हत्या केली होती. महालक्ष्मीच्या हत्येने श्रद्धा हत्याकांडची भयंकर आठवणी जाग्या केल्या आहेत.

# माझा दौरा रद्द करणारा अजून, पक्षातील नेत्यालाच अजित पवारांनी झापलं

■ मुंबई : यश सावंत

'मध्ये कोणीतरी पट्ट्या म्हणाला, दादांचा दौरा मी रद्द केला, अरे तू कसा रद्द केला.अजित पवाराचा दौरा रद्द करायला अजून माणूस जन्माला यायचाय'', अशा शब्दात अजित पवारांनी पक्षातील नेते उमेश पाटील यांचे नाव न घेता त्यांना चांगलच सुनावलं आहे.



पक्षातील माजी आमदार राजन पाटील यांच्याशी असलेल्या वादामुळे उमेश पाटील यांनी थेट अजित पवारांनाच आव्हान दिलं होतं. त्यानंतर आजच्या सभेत अजित पवारांनी उमेश पाटलांना झापलं आहे. मोहोळ येथे अजित पवारांच्या दौऱ्यापूर्वीच अजित पवार गटातील नेते उमेश पाटील यांनी मोहोळ बंदची हाक दिली होती. यावर अजित पवारांनी त्यांना चांगलेच सुनावले आहे. ''मध्ये कोणतरी पट्ट्या म्हटला, दादांचा दौरा मी रद्द केला. अजित पवारने आखलेला दौरा रद्द करायला अजून माणूस जन्माला यायचाय, असे म्हणत अजित पवारांनी उमेश पाटील यांच्यावर निशाणा साधला. तसेच, पंतप्रधानांचा कार्यक्रम असल्याने शेवटी आपल्याला ॲडजस्ट करावी लागते. त्यामुळे मी माझा दौरा पुढे ढकलल्याची माहिती दिली. पण कुणी मध्येच म्हणतेय माझ्यामुळे झाला, असे अजित पवारांनी सांगितले.

# विरुद्ध दिशेकडील वाहतुक रोखण्यासाठी ठाण्यात 'टायर किलर'

■ ठाणे : सतिश सोनावणे

**विरुद्ध दिशेने होणारी वाहतुक रोखण्यासाठी ठाणे महापालिकेने ठाण्यातील रस्त्यांवर टायर किलर (टोकदार उपकरणे) बसविण्याचा निर्णय घेतला आहे. अपघात आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर हे 'टायर किलर' बसवण्यात येणार असल्याची माहिती ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली. हे टायर किलर बसवण्यापूर्वी त्याची सविस्तर माहिती त्या त्या भागात दिली जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.**

घोडबंदर रोड तसेच अंतर्गत रस्त्यांवर होणाऱ्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शुक्रवारी बैठकीचे आयोजन महापालिकेच्या नागरी प्रशिक्षण केंद्र येथे करण्यात आले होते. या बैठकीस ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, महापालिका उपायुक्त दिनेश तायडे, शंकर पाटोळे, उपनगर अभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, घोडबंदर रोडचे नोडल अधिकारी आणि कार्यकारी अभियंता संजय कदम यांच्यासह मेट्रो प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

विरुद्ध दिशेने वाहने चालविल्याने अपघात, वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे प्रायोगिक तत्त्वावर 'टायर किलर' बसवण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अशी ठिकाणे वाहतूक पोलीस निश्चित करणार आहेत. त्यानंतर तेथे महापालिकेतर्फे टायर किलर बसवण्यात येतील. हे टायर किलर बसवण्यापूर्वी त्याची सविस्तर माहिती त्या भागात दिली जाईल. टायर किलर बसविल्याबाबतचे माहिती



फलक १०० ते २०० मीटर अंतरावर लावण्यात येतील. या भागात रात्रीच्या वेळेस पुरेसा प्रकाशझोत असल्याची खात्री केली जाईल. तसेच सीसीटीव्ही कॅमेरा क्षेत्रात तो भाग येत असल्याचे निश्चित केल्यानंतर हे उपकरण बसवले जातील. या उपाययोजनेमुळे विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनांना अटकाव होईल, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. मागील दोन आठवड्यांत घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीवर नियंत्रण मिळवण्यात बऱ्यापैकी यश मिळाले आहे.

वाहतूक कोंडीपासून मुक्तीसाठी करीत असलेल्या या उपाययोजनांचा सातत्याने आढावा घेतला जात असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे. घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीच्या समस्येची तड लावण्यासाठी झालेल्या पहिल्या बैठकीमध्ये ठरवण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार विविध यंत्रणांनी एकमेकाशी समन्वय राखून उपाययोजना केल्याची आल्याची माहिती वाहतुक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली. तसेच, सध्या असलेल्या अडचणी व त्यावरील संभाव्य तोडगे यांचे विवेचनही त्यांनी केले. त्याचबरोबर, १२.५ टन वजन क्षमतेच्या पुढील वाहने ही अवजड वाहने आहेत. त्यात सरसकट सर्व मालवाहू वाहने येत नाहीत. त्यामुळे तशी काही मालवाहू वाहने दिसली तर गैरसमज होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गायमुख घाट, भाईंदर पाडा ते गायमुख या पट्ट्यामध्ये अजूनही वाहतुकीसंदर्भात काही उपाययोजना करण्याची गरज शिरसाट यांनी व्यक्त केली. दीडशे ते दोनशे टन वजनाची वाहने गायमुख घाटातून जातात. त्यामुळे पावसाळयात डांबरी रस्ता सतत खराब होतो.

# सागरी किनारा मार्ग आता सातही दिवस रात्री १२ वाजेपर्यंत खुला, रात्री १२ नंतर प्रकल्पाची उर्वरित कामे करणार

■ मुंबई : विशाल कारंडे

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातील वाहतूक व्यवस्था आठवड्यातील सातही दिवस सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला होता. प्रकल्पाची उर्वरित कामे पूर्ण करण्यासाठी हा मार्ग शनिवारी व रविवारी बंद ठेवला जात होता. मात्र वाहतूक पोलिसांच्या विनंतीनुसार पालिकेने आता आठवड्याचे सातही दिवस सकाळी ७ ते रात्री १२ वाजेपर्यंत हा मार्ग वाहतुकीसाठी खुला ठेवण्याचे ठरवले आहे.

धर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता




(दक्षिण) प्रकल्पातील शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट) उड्डाणपूल ते वांद्रे – वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंतच्या टप्प्याचे बांधकाम बृहन्मुंबई महानगरपालिका करीत आहे. आतापर्यंत या प्रकल्पाचे ९२ टक्के काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची दक्षिण मुंबईकडे जाणारी मार्गिका नुकतीच वांद्रे – वरळी सागरी सेतूला जोडण्याचे काम पूर्ण झाले. या मार्गिकेवरून उत्तर मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. मात्र प्रकल्पाची काही कामे शिल्लक असल्यामुळे सागरी किनारा मार्गाचा काही भाग शनिवारी व रविवारी बंद ठेवण्यात येतो. परंतु, त्यामुळे भुलाबाई देसाई मार्ग येथून सागरी किनारा मार्गाच्या दिशेने येणाऱ्या वाहनांची गैरसोय होत होती. या परिसरात शनिवारी व रविवारी प्रचंड वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे हा संपूर्ण मार्ग शनिवारी व रविवारी सुरू ठेवावा अशा सूचना वाहतूक पोलीसांनी पालिकेच्या सागरी किनारा मार्ग विभागाला केल्या होत्या. त्यानुसार पालिका प्रशासनाने आता हा मार्ग आठवड्यातील सातही दिवस सुरू ठेवण्याचे ठरवले आहे. वाहतूक पोलिसांच्या सूचनेनुसार मुंबई किनारी रस्ता प्रकल्प गणेशोत्सवादरम्यान ६ ते १८ सप्टेंबर या कालावधीत २४ तास वाहतुकीसाठी खुला होता.

# शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात, राज्यातील सर्व शिक्षक संघटनांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

■ बदलापूर : सुचिता देशमुख

शासनाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील चुकीच्या धोरणात विरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी शासनाविरोधात आंदोलनाचा निर्णय घेतला असून ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षक येत्या बुधवार, २५ सप्टेंबरला सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. त्यामुळे या दिवशी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद राहणार आहेत. १५ मार्च रोजी शिक्षक संच मान्यता आणि ५ सप्टेंबरच्या कंत्राटीत शिक्षक भरती संदर्भातल्या शासन निर्णयामुळे २० पट असलेल्या



शाळेमध्ये एक कायम तर एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. आधारवर संचमान्यता होत असल्याने दुर्गम भागात विद्यार्थी अधिक आहे. मात्र आधार नोंदणी नसल्याने अनेक शिक्षकांची पदे कमी होणार आहे. त्यामुळे शासनाचे हे धोरण डोंगरी दुर्गम भागातील तसेच वाडी- वस्तीवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहेत. शासनाच्या या निर्णयाविरोधात विद्यार्थी, शिक्षक पालकांमध्ये असंतोष आहे. तसेच शिक्षकांच्या अनेक मागण्या देखील आहेत. या मागण्यांचा पाठपुरावा आणि शासकीय धोरणांचा विरोध करण्यासाठी सर्व शिक्षक संघटनांनी त्रिस्तरीय असहकार आंदोलन पुकारले आहे.